

# श्री साईलीला

मे　　　कि. ५० पैसे　　　१९६८

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २५५७३१



# श्री साई वाक्सुधा

" धैर्य—धीर धरून वागणें म्हणजेच सबुरी. तिला कधींही दूर सारतां नये. नेहमीं तिच्या सहवासांत राहिलें पाहिजे. कोणतेंही लहानमोठें संकट येवो. त्या त्यावेळीं तीच तुमचें रक्षण करील. पुरुषांचा खरा पुरुषार्थ तिची कांस धरण्यांत आहे. तुमच्या पापाचें, तापाचें नि दैन्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य तिच्या ठायीं आहे. मोठ्या युक्तिप्रयुक्तींनें संकटप्रसंगीं बचाव करणारी तीच. तिची कांस धरणाऱ्यानें कशाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं."

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] मे १९६८ [ अंक २ रा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४२२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

प्रत्येक माणसाला आपल्यांत कांहीं तरी उणीव आहे याची जाणीव झालेली असते. परंतु त्याच्या मनावर अनेक पुटें चढलेलीं असतात तीं साफ झाडून गेल्याशिवाय आपल्यांत काय कमी आहे हें त्याला अवगत होत नाहीं. तें अवगत व्हायला पूर्वपुण्याईचा संचय पदरी असावा लागतो.

मनुष्य संसारांतील सुखोपभोगांत दंग असतो. नानाप्रकारचीं सुखें आपणास मिळावीं म्हणून त्याची सदैव धडपड चाललेली असते. न्याय, अन्याय, नीति व अनीति यांची फारशी चाड तो बाळगीत नाहीं. त्याला सुखोपभोग, चैन, विलास हवे असतात. ते प्राप्त व्हावे म्हणून तो मल्याबुऱ्या मार्गांचें अवलंबन करीत असतो. आणि मग ठेंचा खातां खातां त्याला कधींतरी एक दिवस खऱ्या सुखाकडे वळण्याची बुद्धि होते.

ह्या बुद्धिलाभ कोणाच्या वाट्यास कधीं येईल हें सांगणें कठीण आहे. हा लाभ पूर्व सुकृताविण काय होतो ? असें म्हणणें प्राप्त आहे. कांहींना जन्मल्यापासूनही दृष्टि प्राप्त होते व त्या मार्गानें पूर्णत्वाकडे त्यांची वाटचाल सुरू होते. कांहींना तारुण्य ओसरल्यानंतर तर कांहींना आयुष्याच्या अखेरी अखेरीस या गोष्टीची जाणीव होते. ती जाणीव ज्यांना लौकर होते ते खरोखर धन्य होत.

जाणीव झाल्यानें आपण काय करतों ? सदाचारानें, न्यायनीतीनें व प्रेमभावानें वागूं लागतों. सदाचार हा सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे. या धर्माची कांस ज्यानें धरली त्यानें दुसरें कांहीं करण्याची जरुरी नाहीं.

म्हणजे करायचें काय ? दयाधर्मानें वागायचें. सर्वभूति प्रेमभाव बाळगायचा. सर्वांच्या कल्याणासाठीं झटायचें. मन कुठेंही बहकूं द्यायचें नाहीं. मनाची स्थिरता साधावयाची. जें जें कांहीं करायचें तें भगवंताच्या नावानें व भगवंतासाठीच करायचें.

मी कोण ? मी त्याचीच एक प्रतिमा आहें. आपल्या सभोवार जीं माणसें वावरत आहेत त्याही त्याच्याच प्रतिमा आहेत. ही जाणीव अंतःकरणांत पूर्णपणे बिंबली पाहिजे. ती बिंबली म्हणजे आपण कोणाचाच मत्सर करणार नाहीं. कोणाशीं दुष्टावा धरणार नाहीं ! कोणाच्या मनाला लागेल असे बोलणार नाहीं व सर्वांशीं प्रेमानें—आत्यंतिक प्रेमाने वागूं.

हें सारें जग विष्णुमय आहे ही भावना ज्याच्या हृदयांत दृढ झाली, त्याच्यापासून भगवत् चरण दूर रहाणें कधींही शक्य नाहीं.

आम्ही आमचा आजच्या या जन्माचा धर्म कोणता तो अचूक ओळखला पाहिजे. आमच्या वाट्यास व्यवसाय कोणताहि आलेला असेना का. तो इमानेइतबारें उरकीत असता घरीं-दारीं व बाहेरच्या जगांत नानाप्रकारच्या व्यक्ति आपणास भेटतील, व्यवहार करतांना आम्हीं कसे वागतो, याचें फार महत्त्व आहे. स्वतःच्या स्वार्थाबरोबर इतरांचें कल्याण साधण्याकडेही आमचें लक्ष असलें पाहिजे.

आम्हांला पूर्णत्वाकडे जायचें आहे. तें कसें साधेल ? त्यासाठीं प्रथम आम्हीं पूर्ण होण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. सभोवारच्या साऱ्या जगाशीं मिळतें घेण्यांत, सर्वांशीं सेवाभावानें नि प्रेमानें वागण्यांत व सर्वांच्या कल्याणासाठीं झटण्यांत आपल्याठायीं असलेले दोष आस्ते आस्ते नाहींसे होण्याच्या मार्गास लागतील व आपण पूर्णत्वाच्या मार्गानें वाटचाल करूं लागूं.

ही वाटचाल म्हणजे आमच्या अभ्युदयाचा आरंभकाळ होय. ज्यानें हा मार्ग घट्ट पकडला तो कधींना कधीं पूर्णत्वाप्रत जाण्याचें आपलें ध्येय प्राप्त करून घेतल्याविना रहाणार नाहीं. मग सद्गुरूच्या रूपानें देव तुमचा वाटाड्या होईल आणि तो करुणाघन तुमच्यावर कृपेची वृष्टि करील.

— संपादक



# श्रद्धा आणि सबुरी

लेखक—**प्र. श्री. जठार.**

सब्र म्हणजे शांति. सबुरी म्हणजे धीर. श्रद्धा म्हणजे भक्ति. श्री. साईबाबांची मुख्य शिकवण म्हणजे श्रद्धा आणि सबुरी धरा. बाबांचा हाच "गुरु-मंत्र" हा मंत्र जपला—आचरणांत आणला की सर्व सिद्धी प्राप्त होतात.

"समर्थांचें बाळ पांघरे वाकळ।
हांसती सकळ लाज कोणा॥
देव असतां दैन्य उरे कैंचें बापा।
आम्हांसी तूं कैसा विसरलासी॥
ऐसा तूं अविनाश त्रिभुवनीचा राजा।
प्रमा म्हणे माझा तूंची स्वामीसाई॥

सत्याला पळवाट नाहीं. रोजच्या व्यवहारांत पण सत्य डोळ्याआड करता येत नाहीं. आणि कोणींही करू नये. धर्मराज साक्षांत धर्माचा पुतळा. पण नरोवा कुंजरोवा करून फसला. कर्ण, भिष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य ह्यांनी सत्याला पाठ दाखविली. भर सभेंत द्रौपदीने विचारले, पितामह माझं वस्त्रहरण चालले आहे हे योग्य आहे काय? पितामहाने सांगितले, आम्ही खाल्लया अन्नाचे व धनाचे मिंधे आहोंत. आम्हांला कांहींच करता येत नाहीं. असत्याची पाठराख केल्यामुळें ह्या सर्वांचा शेवटी नाश झाला. केवढा हा सत्याचा प्रभाव!

श्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा नव्हे. श्रद्धा म्हणजे ज्ञान. श्रद्धा म्हणजे द्वैत नव्हे. श्रद्धा म्हणजे अद्वैत. श्री. साई म्हणतात, अरे बाबा! ही मधली तेळ्याची भिंत पाडून टाक. हा तुझ्यामाझ्यामधील पडदा, अंतर नाहीसे कर, सर्व चराचरामध्ये भरलेला ईश्वर तुझ्या माझ्यात भरला नाही का? अशी कोणती जागा असू शकेल की जेथे ईश्वर नाहीं. मग तुलाच सोडून तो कोठे राहिला? तु जे स्वतः चांगले करतोस ते पण मला अर्पण कर व वाईट जे करतोस ते पण मला अर्पण कर. बरेवाईट करणारा तूं कोण? चांगल्यांत पण मी आहे व वाईटांत पण मीच आहे. फुकटचे ओझें (बऱ्यावाईटाचे) तूं स्वतःच्या डोक्यावर वाहू नकोस. तू जे जे काही करतोस तें सर्व मी पहातच आहे.

"कोणावरी कोपवावे तरी माझ्यावरी कोपावें."

तुला कोणावर रागवावयाचे असल्यास तूं माझ्यावरच रागव. मलाच शिव्या दे. त्यातून तुला सत्य सापडेल. तुझे समाधान होईल. कोणाला हडफड करूं नकोस कारण मी तोच आहे. तुला कोणाला काही देता येत नसेल तर देऊं नकोस; पण त्याला न दुखवता गोड शब्दांनी सांग.

एकदां एक सत्यकथा अशी झाली कीं, एक साईभक्त होता. त्याच्या घरांत मात्र त्याची महाकर्कशा त्याची बायको होती. ती त्याला अक्षरशः छळावयाची, त्या माऊलीचे कशांत म्हणून समाधान होत नसे. नवऱ्याचा उद्धार त्याच्या भक्तमंडळीत करावयास ती कचरत नसे. बाई तर शरीर प्रकृतीने येवढी किरकोळ व नेहमीची दुखणाईत की तिला हात लावणे म्हणजे साक्षात ब्रह्महत्तेला आमंत्रण देण्यासारखे. नवरा तर तालीमबाज गडी. अशी ही जोडी होती. आम्ही त्याला तुकाराम महाराज म्हणत असूं. अतीशय शांत, प्रेमळ आणि निःस्वार्थी असा हा साईभक्त होता. तुकारामाचा भक्तीभाव आम्ही काय वर्णन करावा ? मागील एका साईअंकांत आपण वाचले असालच की "सखपाळ" म्हणून एका इंजीन डॉयव्हरचे डोळे बॉचलर टयूब फुटून दोन्ही डोळ्यात काचा जाऊन सखपाळसिंगला अंधत्व आले होते व आमच्यातील एक माणूस तुकारामाला बोलला, "महाराज हे तुमच्या घरी आलेला सखपाळ आंधळा होण्यापेक्षा मेला असतातरी सुटला असता. तुम्ही बाबाचें भक्त म्हणवता मग हे असे का ? तुम्ही सत्याचे कैवारी म्हणवता, मग आम्हाला सत्याची प्रचीती दाखवा. झालं एवढे बोलणे होते तोंच तुकारामाची बायको कडाडली, अहो कसले काय घेऊन बसले आहेत हे सर्व ढोंग आहे. नावाला म्हणून हें नोकरी करतात. मीलमध्ये एकदम महिन्याचे राशन मिळते ते हे महिन्याला घरी आणून टाकतात. अधून मधून सटरफटर वस्तू आणतात. ह्यांचा पगार कधी माझ्या हातांत येत नाहीं. माझ्या ह्या संसाराचे हें हाल. अन्न आहे तर वस्त्र नाहीं. आणि आमचें घर तर सर्वदा खुली–धर्मशाळा, आतां खरं सांगावयाचें म्हणजे तुकाराम महाराज खाऊनपिऊन सुखी मुलेबाळें व्यवस्थित शिकणारी, वृद्ध पित्याची सेवा चाललेली अशी दृष्ट लागण्यासारखी परिस्थिती आणि बाईचे हें असे वाक्ताडन. कधींही न गरम होणारे तुकाराम महाराज पण अतिशय गरम झाले. त्यांची भव्य छाती, दंड स्फुरण पावले. डोळे लाल झाले. आम्ही सर्वजण घाबरून गेलो. तुकाराम महाराज रागाने उठले. आम्हाला वाटले कीं आतां बायकोची हा माणूस खिरापतच करणार आणि असा हा आडदांड माणूस कोण सावरणार ? झालें तुकाराममहाराजानें श्री साईचा फोटो रागानें उचलला व खिडकीबाहेर फेकून दिला. ह्यांत बाबाचा दोष काय होता ? पण हें भक्त आणि बाबांची लीला. थोड्या वेळांत तुकाराम महाराज

शांत झाले व उठून त्यांनीं तो फेकलेला फोटो परत आणला आणि काय आश्चर्य ! येवढ्या जोराने फोटो फेकून फोटोची काच सुद्धां फुटली नव्हती. तुकाराम महाराजाने फोटो पुन्हा देव्हाऱ्यांत लावला व श्री साईबाबांना प्रार्थना केली, “ बाबा ! हा माझा मित्र सखपाळ राजकोट रेल्वे हॉस्पिटलमधून उपाय थकले म्हणून जगजीवनराम हॉस्पिटलमध्यें आला आहे तरी त्याला दृष्टी–दान द्या. त्याप्रमाणें सखपाळला परत दृष्टी आली व कर्कशापण सुधारली. श्री साई आणि भक्ताचें नातें पहा किती गंमतीचे. भक्तांनीं सांगावयाचे आणि देवाने ऐकावयाचें व त्या प्रमाणें करावयाचें. सखपाळची दृष्टी म्हणजे एक Medical miracle आहे. वैद्य शास्त्राचें ते एक गूढ आहे. गेलेली दृष्टी परत आली. भक्तानें सांगावयाचें, देवा आतां उठा ! काकडआरती आम्हांला करावयाची आहे. देव उठणार ! देवा दुपार झाली आहे आतां भोजन करा. देव सुकाट्यानें भोजन करतो. रात्र झाली देवा ! झोपा आतां, उजेडाचा त्रास होऊं नये म्हणून पडदा सारून ठेवतो.

“ आतां सुखे निद्रा करा साईनाथा ” आणि काय नवल, देवाला झोप येऊं लागते.

आतां विचार करा, देव झोपल्यावर हें त्रिभुवन चालेल कां ? पण आमचा देव असा विनोदी कीं, लगेच हांक मारून म्हाळसापतीला सांगेल, “ अरे ! हें बघ मी झोपतो, पण जरा माझ्यावर लक्ष ठेव हो ! नाहीतर मी झोपलो आहे असे समजून माझ्याबद्दल निर्धास्त राहशील ! ”

धन्य ती शिरडी ब्रह्मपुरी आणि धन्य ते साईभक्त आणि धन्य तेथील ते पुजारी आणि इतर सेवक, ज्यांना बाबांची सेवा करावयास मिळत आहे.

वरील श्रद्धा ही अंधश्रद्धा आहे काय ? नाही. कारण त्याला सत्याचा पुरावा आहे. मग ज्यांना तसा प्रत्यय आला नाहीं त्याचें काय ? सॉक्रेटीस म्हणतो, दोन्ही बाजूंची तुलना करून त्याचें तारतम्य ठरवावयाचें असतें. “ सत्य ” पहाण्यांसाठीं दोन्ही बाजू समोर हव्या असतात. सॉक्रेटीसचें म्हणणें खरें आहे. सत्याला धरूनच आहे. कारण “ धुरी ”चा अंगिकार केल्याशिवाय कार्यसिद्धी नाही. बाबा म्हणतात:—

> “ जेथें भक्ति श्रद्धान्वित ।
> तयाचा मी नित्यांकित ।
> ये अर्थी न व्हावें शंकित ।
> इतरत्र अप्राप्त मी सदा ॥

श्री रामदासस्वामी म्हणतातः—
“ मनीं धरावें तें होतें ।
विघ्न अवघेंची नासोनी जातें ।
कृपा केलीया रघुनाथें ।
प्रचीत येते ॥

विश्वांत जें दृश्य आहे तें सर्व आपल्या हृदयांतच वास करतें. मी माझ्या मनाचा राजा आहे. डोळे जें पहातात तें मनाला जाऊन सांगतात आणि जो मी “ चैतन्य ” तें मी तें जाणतों. तीच “ तुर्या–शक्ति ” आणि ह्या तुर्या–शक्तिपुढें जरा पाऊल टाकलें कीं आपण “ प्रज्ञान–ब्रह्मांत ” जातो. जिकडे नुसते “ Awareness ” ( जाणीव ) असते तिकडेच आमचे साईबाबा बसतात.

मग भक्तानें ही श्रद्धा व सबुरी कशी काय मिळवावी ?

तुकाराम महाराज म्हणतातः—

ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी ।
तरी कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥
शास्त्राचें मांडण जप तिर्थाटण ।
उर्वीचें भ्रमण याचसाठीं ।
याचसाठीं जप याचसाठीं तप ॥
व्यासें ही अमुप ग्रंथ केले ।
याचसाठीं ( साईपाय ) संतपाय सेवावे ।
तरीच तरावें तुका म्हणे ॥ ५०१ । २५५९ ॥

# नामदेवांची अमृतवाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम. ए.

**बाजी रची बाप बाजो रची**

हे जग हा खेळ मांडला आहे. बापा! तो खेळ मांडला आहे. त्या खेळांत मी केवळ एक प्यादे असून तूं खेळणारा आहेस. जन्ममरण ही तुझी क्रीडाच आहे. हे मना! हा सर्व खेळ चालला आहे. या क्रीडेचा मनांत चांगला विचार कर. म्हणजे परमेश्वर आपणच सूत्र आणि आपणच सूत्रधार आहे, असें दिसून येईल. नामदेव म्हणतात, (तुझ्या पायाशीं) शरणागतीच जन्ममरणाचे फेरे चुकवील.

**तूं न बिसारि तूं न बिसारि**

तूं विसरला नाहींस! तूं विसरला नाहींस!! स्वामी! मी तर अगदीं विसरून गेलो आहे! हेच माझें दुर्भाग्य!! तूं अखिल ब्रह्मांडाचा नायक गरुडवाहन आहेस. तूं अंतर्यामी हरी कालातीत आहेस. (कालेन अति क्रान्त :- He whot ranscends the time) जन्ममरणाच्या विचाराचा त्याग करून ह्या दासानें तुझी पूजा केली. तुझ्यासारखा अन्य देव नाहीं. तूं जर विश्वंभर, तर नामदेव तुझा दास आहे. तूं सकल संतजनांचे मनोरथ पुरविणारा आहेस.

**बाप मंझा समझि न परई**

हे माझ्या परमात्म्या! मला तूं परका समजूं नकोस. सत्याचा त्याग करून दुसऱ्या कोणाचा कशास मरी पडावयाचे? पाण्याची रास (ढीग) आणि वायूचा खांब, अशा विलक्षण सृष्टीची रचना कोणत्या उपायानें आरंभीं केलीस? "या ठिकाणीं उत्पत्ति झाली आणि येथें विलय झाला," हें सांगणारा कोठें सामावेल? (जो सृष्टीची उत्पत्ति आणि विलय सांगतो ती कोठें सामावणार? म्हणजे कोठेंच नाहीं!) दास नामदेव म्हणतात ऐक! नारायणाचे नामास्मरण कर...जशी आपली आवड असेल

तशी तो इच्छा पूर्ण करीन. जिवंत असतांना रामाचा प्रकाश (रामाशी एकरूपता वा ज्ञान ) संपादन केला नाहीस तर मेल्यावर तो मिळण्याची कसली आशा ?

केसे तिरत बहु कुटिल भरयो

176

तीर्थे ही कशी अत्यंत कुटिलतेनें भरली आहेत. कलीची चिन्हें दिसत असूनहि भीति वाटत नाहीं ! कसली सेवा आणि कसले ध्यान ? ( ही सेवा किंवा ध्यान करणारे ) म्हणजे जणुं काय शुभ्र बगळेंच ! भक्ति म्हणजे केवळ दूध पिणारा भुजंगच ! बुद्धिरूपी मांजरी जणुं देवांगनाच वाटते. नामदेव म्हणतात कीं, या गुणांनीं बद्ध झालेल्या बुद्धि-रूपी डाकिणीनें आपलेच जगरूपी अपत्य खाऊन टाकले.

काल भै बापा सह्या न जाइ

बापा ! कालाची भीति असह्य आहे. अतिशय भयभीत झालेल्या जगालासुद्धां तो खाऊन टाकण्याचे सोडत नाहीं. याच्याशी अनेक मुनीश्वरानीं झुंज केली. याच्यावर उपाय करता देव व मानव थकले. याच्यापुढें पीर, पैगंबर, देव, ऋषी व चौऱ्याशीं लक्ष योनि यांनासुद्धां कंप सुटतो. चंद्र. सूर्य, पृथ्वी, वायु, आकाश, पाणी, अग्नी हे सुद्धां विचलित गात्र होतात. अविचल असे फक्त देव नारायण आहेत. त्या अलक्ष्य निरयबाला ( भेद रहिताला ) नामदेव प्रणाम करतात.



# नामसाधनेचें महत्त्व

## (२)

लेखक : प्रा. के. वि. बेलसरे

तीन उपाय—कोणत्याही परिस्थितीत आपला आनंद कायम टिकविणे किंवा आपले समाधान अचल, घट्ट आणि ताजें टिकणें याचेच नाव भगवंताचे दर्शन ही खुणगाठ पक्की बांधावी. समाधान किंवा आनंद हा एक अनुभव आहे. आनंदाचा अनुभव दृश्यावर अवलंबून नसल्याने तो इंद्रियांच्या पलीकडे म्हणजे केवळ मनाच्या क्षेत्रांत राहातो. अगदीं हलक्या अनुभवापासून ते साक्षात भगवंताच्या दर्शनापर्यंत मनच काम करते. समाधान देणारे किंवा ते भंग करणारें आपलें मनच असतें. मनाचा उदयास्त म्हणजेच जगाची उत्पत्ति, स्थिति व लय. जिवाचा बंध किंवा मोक्ष मनावरच अवलंबून आहे. मन संकल्परूप असल्यानें वस्तु समाधान देईल ही मनाचीच कल्पना. आसक्ति हा मनाचाच धर्म. अशा या मनाचें सामर्थ्य अचाट आहे. खऱ्याला खोटें तर खोट्याला खरें, मोठ्याला लहान तर लहानाला मोठें, दृश्याला सत्य तर अदृश्याला असत्य, मूल्याला व्यर्थ तर मूल्यहीनाला सार्थ मनच बनवितें. अशुद्ध अवस्थेत भ्रमानें जें मन स्वरूपाचा, म्हणजेच भगवंताचा विसर पाडतें तेंच मन शुद्ध अवस्थेंत मायेचा निरास करून आनंदाचा सुकाळ करते. आपले मन सध्या अशुद्ध अवस्थेत आहे. तें शुद्ध करणें हेंच साधनाचें रहस्य समजावे. दृश्यांत भ्रमून गेलेले मन किंवा वस्तूंना चिकटून बसलेलें मन तेथून सोडवून मोकळें करणें हेच सर्व साधनांचें मर्म असतें. दृश्यापासून मोकळें केलेलें मन अति सूक्ष्म व विशाल होतें. मग आत्मानंदाचा साक्षात् अनुभव घेण्यास तें पात्र बनतें. मन शुद्ध होण्यासाठीं तीन परिणामकारक उपाय आहेत (१) ब्रह्माभ्यास (२) वृत्तिनिरोध (वासनात्याग. या तीन उपायांपैकीं कोणताहि एक उपाय पूर्णपणें आचरणांत आणल्यास बाकीचे दोन्ही उपाय त्यामधे आपोआप यतात. आपण कोणता उपाय अवलंबावयाचा हें आपल्या मनाच्या सामर्थ्यावर अवलंबून असतें.

ब्रह्माभ्यास—"सर्व ठिकाणीं आनंदरूप परमात्मा ओतप्रोत भरून राहिला आहे आणि तोच मी आहे" अशी निःसंशय दृढभावना करून अखंड समाधानांत राहाणें या उपायाचें हृदय होय. आपल्या जीवनांत अनेक शुभाशुभ आणि सुखदुःख देणाऱ्या

घटना घडत असतां माझें तुझें, आपले परावें या भेदाच्या पलीकडे कांहीहि घडलें तरी आपल्या आनंदावर विरजण न येऊं देतां अत्यंत शांत राहाणें म्हणजेच ब्रह्माभ्यास करणें समजावें. या अभ्यासांत हे दृश्य जगत् असत्य आहे, तसाच आपला देह देखील असत्य आहे अशी ठाम समजूत धारण करावी लागते. निश्चय मोठा बळकट लागतो. आपलें मन जशी भावना करते तसें जिवाचें स्वरूप बदलतें. अर्थात देहांतून कितीहि सूख घेतलें तरी आपल्याला समाधान मिळणार नाही अशी खरी दृढभावना जर का मनानें एकदां केली तर देहाच्या सर्व अवस्थांमध्यें आपला आनंद ढळणार नाहीं. असा अनुभव येण्यासाठीं " मी देह नव्हे, मन नव्हे, बुद्धि नव्हे, मी शुद्ध आनंदरूप आत्मा आहे. " असें सतत व घट्ट अनुसंधान टिकणें अवश्य असतें. हा अभ्यास जर खरोखर साधला तर आनंदरूप भगवंताचें दर्शन होण्यास वेळ लागणार नाहीं. परमानंदाचें अनुसंधान सतत जागृत राहिले तर दुसरी वृत्तीच मनांत डोकावणार नाहीं. त्या अनुसंधानानें मन पूर्ण निर्विकार व संकल्परहित बनून उन्मन होऊन जाईल. हा उपाय सर्वोत्तम तर खराच पण कोट्यावधि लोकांत एखाद्याच्याच तो पचनीं पडतो. प्रपंचांतील सर्व गोष्टी अनुकूल असता " मी आनंदरूप आत्मा आहे. मी ब्रह्म आहे " अशा बाता मारायला काय लागतें ! स्वतःचा किंवा प्रिय माणसाचा मृत्यु समोर उभा असता, देहरोगानें व दुःखानें गांजला असता, दारिद्र्याचा फेरा आला असतां आणि बेअब्रूचा मोठा प्रसंग गुदरला असतां " मी ब्रह्म आहे " हें अनुसंधान ज्याचें ढळत नाहीं त्याला ब्रह्माभ्यासाचा अधिकार आहे असें समजावें. एका आनंदाशिवाय आपल्या देहासकट सर्व वस्तु असत्य आहेत अशी निश्चित धारणा झाल्यावांचून हा अभ्यास साधत नाही.

( २ ) वृत्तिनिरोध—हा मुख्यतः योगमार्ग आहे. वृत्तींचा निरोध करतां येण्यासाठीं प्रथम वृत्ति म्हणजे काय हे समजलें पाहिजे. पंचकोशांपैकीं प्राणमय, मनोमय आणि विज्ञानमय कोश एकमेकांत अत्यंत मिसळलेले असतात. अंतःकरणांत वासना जागृत होऊन प्रगट होण्यासाठीं धडपकड करूं लागली म्हणजे वरील तिन्हीं कोशांमध्यें सूक्ष्म हालचाल सुरू होते. या हालचालीला वृत्ति असें म्हणतात. प्रत्येक वृत्तीमध्ये तिला दिशा लावणारा बुद्धीचा अंश असतो. त्या दिशेनें कसें जावें, काय करावें इत्यादि संकल्प-विकल्प मन करूं लागतें आणि शेवटीं वृत्तीची ऊर्मि बनून कृति घडण्यास लागणारी शक्ति प्राणमय कोशांतून मिळते. त्यातल्यात्यांत प्राण आणि मन एकमेकांत अधिक समरस असल्यानें प्राण आवरला कीं मन आवरले जाते. शरीरांतील मज्जातंतूंतून म्हणजे नसांतून प्राण वाहात असतो, म्हणून प्राणाचा निरोध करण्यास मोठेच तंतूबल आणि मेंदूचे बल लागते. सामान्य मनुष्याचे ठिकाणी हे बल क्वचितच आढळत असल्याने हा सामान्यांचा मार्ग नव्हे. बरे मनाचा निग्रह करून वृत्तीचा निरोध करावा असें म्हणावें तर तेंहि सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहे-

रचे दिसतें. आपल्या मनात ज्या वृत्ति उत्पन्न होतात त्या आपल्या आनंदावर झाकण घालतात हें लक्षात येण्यास अगोदर आंतमध्येच बुद्धीने वृत्तीकडे वेगळेपणाने पाहतां यावें लागतें. बहुधा वृत्ति उत्पन्न झाली की आपण तिच्यामध्येंच समरस होऊन ती नेईल तिकडे वाहत जातो. वस्तु मिळाली असतां आपल्याला आनंद मिळेल अशी दृढ भावना असल्याने सामान्य मनुष्याचें मन वृत्तिरूपानें इंद्रियांमधून बाहेर धांवत असतें. त्याला उलटें फिरवून वृत्ति आंतल्याआंत जिरविण्यास मोठीच शक्ति लागते. म्हणून वृत्तिनिरोधाने मनावर स्वामित्व गाजविणारे देखील फार थोडेच आढळतात. शिवाय वृत्तींचा नुसता निरोध केल्याने त्या नाहीशा न होता मनाच्या खालच्या थरामध्यें दबून राहतात. योग्याची मानसिक शक्ति जोपर्यंत शाबूत असते तोंपर्यंत दबलेल्या वृत्ति ताब्यांत राहतात. शक्ति क्षीण झाल्यावर त्याचा ताबा ढिला होतो आणि जराशी पोषक परिस्थिति सांपडल्याबरोबर त्या जोराने उफाळून वर येतात. पुष्कळ योगी लोक साधन सुटल्यामुळे किंवा वय झाल्यावर घसरतात याचे कारण हेच होय. तात्पर्य, सामान्य माणसाचा हा मार्ग नव्हे.

( ३ ) वासनात्याग—वासना हा शब्द वस धातूच्या प्रयोजक रूपापासून झाला असून त्याचा अर्थ "जी ( मनास ) नेऊन ( विषयांत.) बसवित ती वासना " असा आहे. विषय शब्दाचा अर्थ " विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च य इति म्हणजे " ज्यांचें ठिकाणीं इंद्रियें व मन बुडून असतात ते पदार्थ " असा आहे. वासना ही एक शक्ति आहे. सच्चिदानंदरूप भगवंताच्या अनंत शक्तिपैकी दोन महाशक्ति विश्वांत काम करतात. पहिली ज्ञानशक्ति आणि दुसरी क्रियाशक्ति होय. शक्ति केव्हांहि स्वस्थ बसत नाहीं. तिच्या ठिकाणीं सारखी हालचाल किंवा उलाढाल असते. क्रियाशक्ति वासनारूपाने प्रकट होते. ती कधीहि स्वस्थ बसत नाहीं. अनंत प्रकारचीं अनंत नामरूपें निर्माण करून कालाच्या सत्तेने ती त्यांना नाचवते. नामरूपांनीं व्यक्त होतांना तिला उपाधीचें साहाय्य घ्यावें लागतें. उपाधि म्हणजे बंधन किंवा मर्यादा. म्हणून जेथें वासना येते तेथें अज्ञान, आकुंचितपणा, बंधन आणि लहानपणा येतो. आकुंचितपणा आला कीं मूळ आनंद-रूपावर झांकण येते. आनंद लोपल्यासारखा झाला कीं अज्ञानाचा अंधकार निर्माण होऊन दुःख जन्मास येतें. वासना म्हणजे भगवंताचा विसर. जेथें वासना असते तेथें भगवंत असून नसल्यासारखा होतो. या वासनेलाच माया असें म्हणतात. जेथें भगवंत तेथें माया सांवलीप्रमाणें असल्यानें वासनेच्या शक्तीची मजल खुद्द भगवंतापर्यंत पोचते. म्हणून वासना ताब्यांत आणण्यास इतर उपाय लटके पडतात. भगवंताच्या साहाय्यानें वस्तुस्थेची सांवली नाहीशी झाली कीं आनंदरूप स्वच्छपणें प्रकाशतें. भगवंताचें साहाय्य म्हणजे त्याची दुसरी शक्ति शारदा होय. आनंदरूपाची ही ज्ञानशक्ति असल्यानें अज्ञानाचा नाश करण्यास हिच्यासारखा दुसरा उपायच नाहीं. शारदेच्या कृपेने साधक

परमार्थाचा विचार करूं शकतात. निदिध्यासात मन गुंतवून ठेवतात आणि ध्याना-वस्थेमध्यें स्थिर राहूं शकतात. हिच्या साहाय्यानेच योगी समाधि साधतात, साधु तुर्यावस्थेपर्यंत पोंचतात आणि ज्ञानी पुरुष विरक्त बनून आत्मशांति भोगतात. भक्ताला प्रेमाच्या मार्गानें हीच आनंदरूप भगवंतापर्यंत पोंचवते. शारदा स्फूर्तिरूप असून ओंकाररूपानें परावाणीच्या ठिकाणीं वास करते. सद्‌गुरु शिष्याला जें नाम देतात तें हेंच होय. म्हणून शारदा म्हणजेच सद्‌गुरुकृपा समजावी. ती शुद्ध जाणीवरूप असून परमार्थ साधण्यास अनुकूल व्हावी लागते. भगवंताच्या खऱ्या स्वरूपाची, आनंद-रूपाची म्हणजे स्वस्वरूपाची ओळख होण्यास शारदेची कृपा लागते.

माणसामध्यें वासनाशक्ति हवे-नकोपणाच्या रूपानें प्रकट होते तर ज्ञानशक्ति शारदावाणीच्या रूपाने प्रकट होते. वासना सूक्ष्म तर शारदा पण सूक्ष्म. वासना अंतर्यामी. तर शारदा पण अंतर्यामी वासना सर्वव्यापी तर शारदा पण सर्वव्यापी. वासना सामर्थ्यवान् तर शारदा पण सामर्थ्यवान् हे जरी खरें असले तरी एकाच भगवंताच्या या दोन शक्तींमध्यें कांहीं महत्त्वाचे भेद आहेत. वासना अधोन्मुख तर तर शारदा ऊर्ध्वमुख. वासना अव्यक्तांतून व्यक्ताकडे धांवते तर शारदा व्यक्तांतून अव्यक्ताकडे पोंचवते. वासना उपाधि वाढवते तर शारदा उपाधि सोडवते. वासना जीवाला आकुंचित करते तर शारदा त्याला विशाल करते. वासनेची धडपड जडांतून सुख घेण्याकडे तर शारदेची दिशा सूक्ष्म आनंदाकडे. वासनेत शक्तिचा व्यय तर शारदा म्हणजे शक्तिसंचय. वासना म्हणजे संशय तर शारदा म्हणजे निश्चय. वासना म्हणजे आनंदाचा लोप तर शारदा म्हणजे शांति व समाधान. वासना म्हणजे भगवंताचा विसर तर शारदा म्हणजे भगवंताचे स्मरण. तात्पर्य, वासना नाहींशी करण्यासाठीं म्हणजे दुःखाचा नाश करण्यासाठीं म्हणजेच आनंदाच्या प्राप्तीसाठीं शारदाशक्ति म्हणजे भगवंताचें स्मरण, हाच उपाय आहे. भगवंताचें स्मरण म्हणजे भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव. भगवंत आनंदरूप आहे. आनंद म्हणजे प्रणव, ओंकार किंवा नाम होय. अर्थात् वासना नाहींशी करून आनंदरूप बनण्यास नामस्मरण हाच शास्त्रशुद्ध मार्ग आहे. इतकेंच नव्हे तर नामस्मरणासारखें अगदीं सहजसिद्ध दुसरें साधन नाहीं. शुद्ध आनंद अत्यंत सहज आहे. 'सह जायते इति सहजः' म्हणजे जिवाच्या जन्माबरोबर जें येतें आणि जें अगदीं मूळ स्वरूपाला धरून असतें तें. आनंद सहज आहे म्हणजे जन्मास येणाऱ्या सर्व जिवांचा स्वभाव ( स्वतःचें खरें स्वरूप ) आहे. म्हणूनच तो जीवनांतील सर्व उपाधींशिवाय राहूं शकतो. शरीरकष्ट, तपश्चर्या, तीर्थयात्रा, उपासतापास, आसनप्राणायम, वाचनलेख, विद्वत्ता, कला, ऐश्वर्य इत्यादि मानवी जीवनांतील उपाधि आनंदाच्या आड येऊं शकत नाहींत. त्या गोष्टी असोत वा नसोत, आनंद असणारच. त्याचें साधन देखील त्याच्यासारखें

अत्यंत सहज असलें पाहिजे. प्रणव किंवा ओंकार हें तें साधन होय. मनुष्य मुका जरी असला तरी तोंड नुसतें उघडून अ असा आवाज करूं शकतो. ओठ गोल केले की ऊ असा आवाज करूं शकतो. आणि ओठ मिटले कीं आपोआप म होतो. अ ऊ म मिळून ओंकार बनतो. मनुष्य कोणत्याहि देशांत कोणत्याहि काळीं जन्मास आला तरी ओंकाराचा उच्चार अगदीं सहज करूं शकतो. वाणी किंवा ओंकार म्हणजेच नाम हें माणसाच्या बाबतींत आनंदाइतकेंच सहजसिद्ध आहे. जें सहज असतें त्यास कष्ट लागत नाहींत. म्हणून तें सार्वजनिक व सोपें असतें. तात्पर्य सहजरूप आनंदल्या प्राप्तीचें नामस्मरण हें तितकेंच सहाजिक साधन आहे. नाम साधनांचा राजा आहे.

'नामसाधना' या पुस्तिकेंतून कृतज्ञतापूर्वक.



## कोण तुजसम मज !

कोण तुजसम मज साईराया, कैवारी सदया
तूंची माझी माता, तूंची पिता, तूं मज रक्षिता
भयाण जगीं अवघ्याया ॥ १ ॥

तूंची पतितपावन, तूं करुणाघन, तूं कृपासिंधु
तूं भवभय निवाराया ॥ २ ॥

तूं दाविसी पथ, तूं करीसी निर्भय, तूं पुण्याचा संचय
नेसी पाप विलया ॥ ३ ॥

तूं शिरडीप्रति, तूं समीप असशी, तूं पाठीसी
सदैव मज रक्षाया ॥ ४ ॥

—सौ. श्री शहाणे. डोंबिवली.

# संत नामदेवांची हिंदी कविता

## ( लेखांक चौथा )

लेखक : **गणेश विष्णु कविटकर,** एम्. ए.

### ऐतिहासिक महत्त्वाचे संपादन

**डॉ.** भगीरथ मिश्र व डॉ. राजनारायण मौर्य यांनीं संशोधन करून संपादिलेल्या सन्त नामदेवांच्या हिन्दी पदांची संकलित पाठभेदासह संशोधित आवृत्ति नोव्हेंबर १९६४ मध्यें पुणें विश्वविद्यालयानें प्रसिद्ध केली आहे आणि या प्रकाशनाचें रूपानें प्राचीन हिन्दी व इतर भाषेतील वाङ्मय संशोधनाच्या क्षेत्रांत महत्त्वाचे परिवर्तन घडविणारे प्रकाशन झाले आहे यांत मुळीच शंका नाही, या ग्रंथानें नामदेव व नामदेवविषयक हिन्दी साहित्याच्या अभ्यासाच्या इतिहासांत फार महत्त्वाचा टप्पा गांठला आहे. डॉ. भगीरथ मिश्र यांचा संतसाहित्याचा आणि हिन्दी भाषेचा व्यासंग फार मोठा आहे. सन्त–साहित्याचे अध्ययन करीत असतां नामदेवांच्या भावपूर्ण कवितेनें त्यांना आकृष्ट केले; व ते अध्ययन करीत असतांनाच त्यांनी मिळविलेल्या बऱ्याच पदांचे संपादन करण्याची इच्छा त्यांच्या मनांत जागी झाली. याच कालांत त्यांचे सहयोगी प्राध्यापक डॉ. राजनारायण मौर्य यांचे नामदेवरायांच्या पदावलीचे भाषाशास्त्रीय अध्ययन त्यांच्या संशोधनास साहाय्यक झाले. तेव्हां या हिंदी विद्वानांच्या कित्येक वर्षांच्या प्रयत्नांचे आणि व्यासंगाचे हे एक फळ अत्यंत मूल्यवान आहे, हें निराळे सांगणें नको. या ग्रंथाची पूर्णता अद्याप व्हावयाची आहे, हे खरे आहे. तथापि, नामदेवांच्या उपलब्ध हिन्दी रचनेंच प्रमुख अशा या ग्रंथाचे अत्यंत महत्त्व आहे. म्हणून त्यासंबंधीं त्रोटक विवेचन या लेखांत करण्याचे योजिले आहे.

### अभ्यासपूर्ण प्रथम खंड

ज्या कालांत ही पदें लिहिली गेली तो काळ लक्षांत घेतां सन्त नामदेवांनी त्या द्वारें समाजाला जागे केले आणि भारतीय संस्कृतीचें रक्षण केले हे त्यांचे एक थोर कार्य म्हटले पाहिजे. प्रस्तुत पदावलीच्या संपादकांनीं या ग्रंथाला ‘ संत नामदेव युगीन परिस्थितीयाँ,’ ‘ जीवनवृत्त, ’ ‘ पाठ सम्पादन,’ ‘ प्रतियोंका पारस्परिक सबन्ध, ’ ‘ सम्पादन प्रणावली और पाठनिर्णय. ’ या संदर्भांत जे अभ्यासपूर्ण प्रास्ताविक लिहिले आहे ते फार मोलाचे वाटते. त्यांत नामदेव चरित्राची साधनें, नामदेवांचा पद–संभार, पाठ–संशोधन, मूळ भाषिक अध्ययन या बाबतींत चिकित्सक स्वरूपाची

चर्चा प्रथम खंडांत आल्याने संत नामदेवांच्या अभ्यासास ती निश्चितच मार्गदर्शक व प्रगतीच्या दिशेनें हिंदी संशोधनाचे पाऊल पुढें पडण्यास कारणीभूत होईल; देशी हिन्दी वा ब्रजभाषांच्या इतिहासावर बराच प्रकाश पडणार असून शिवाय या भाषेची उत्पत्ति व विकास या प्रश्नासंबंधीहि विचारांना चालना मिळेल, इतक्या महत्त्वाचा हा ग्रंथ आहे.

## मूळ प्रतीच्या उपलब्धीची आवश्यकता

ज्या सामग्रीच्या आधारे प्रस्तुत ग्रंथाची आवृत्ति आधुनिक चिकित्सापद्धतीनें तयार केली आहे त्या मुद्रित व अमुद्रित साधनांची माहिती पाठ—संपादन या प्रकरणांत दिली आहे. नामदेवोत्तर कालांत दुर्गाडीच्या भीषण दुष्काळाचे आलेले संकट ( शा. श. १३१८–१३३० ), त्याचवेळीं झालेली लोकांची फाटाफूट, दाणादाण आणि त्यांना करावी लागलेली स्थलांतरे, राजकीय आक्रमणांच्या लाटेत झालेला व मुद्दाम केलेला ज्ञान–साधनांचा विध्वंस या गोष्टी लक्षांत घेतां नामदेवांनीं स्वहस्ते लिहिलेले हिन्दी पदांचे हस्तलिखित मिळणें जवळ जवळ अशक्य आहे; आणि नामदेवांच्या नजीकच्या काळांतली एखादी हस्तलिखित प्रत हीहि आज उपलब्ध होत नाहीं, हे कबूल करणें भाग आहे. नामदेवांची पदें लोकप्रिय आणि लिपिकार यांनी कीर्तन प्रसंगी गाईलेल्या पदांच्या प्रती तयार करून नेणें हेंहि साहजिक आहे. अशा लिपिकारांच्या हातच्या प्रती मुळांत तयार झाल्या असाव्यात. या जुन्या प्रतीवरून कालांतरानें त्याच परंपरेने नकला झाल्या आणि नकलाकारांच्या हातून कळत नकळत झालेल्या प्रमादामुळें पदावलींत अनेक उपपाठ शिरले. हस्तलिखितांची प्रत्यंतरे होत असतांना किंवा गुरुपरंपरेने त्यांचे अध्ययन होत असतांहि असे पाठभेद नामदेवांच्या पदांच्या हस्तलिखित प्रतीत आढळतात. अशी सर्व हस्तलिखितें जमा करून त्यांतील पाठ सर्व दृष्टींनीं एकमेकांशी ताडून पाहून योग्यतम पाठांची नामदेवांच्या पदांची संहिता तयार करणें हाच मार्ग उरतो आणि त्यानुसार अशी महत्वाची हस्तलिखितें मिळवून नामदेवांच्या पदांच्या मूळ स्वरूपाकडे जाण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रथांत केला आहे. ज्या ज्या प्रदेशांत या मूळ प्रती उपलब्ध झाल्या त्या त्या प्रदेशांतील त्या कालच्या प्रचलित बोलीचा वा भाषेचा परिणाम त्या हस्तलिखित प्रतीवर झाला असण्याची शक्यता विचारांत घ्यावी लागते. यादृष्टीनें या हस्तलिखितांच्या लेखन-कालाची व स्थळांची माहिती असणें आवश्यक आहे.

## उपलब्ध प्रती

नामदेवांची पदें सलगपणें एका स्वतंत्र हस्तलिखितांत मिळत नाहींत. ती दादू-दयाळ, रज्जबजी, गरीबदास, खेमदास इत्यादि दादूपंथी संतांच्या रचनेबरोबर आणि

निरंजनी संत, कबीर, सेवादास हरिदास, तुरसीदास जगजीवण, रैदास, पीपा आदि संतांच्या पदसंग्रहांच्या पुढील हस्तलिखितांत सांपडतात, ( अ ) सेंट्रल पब्लिक लायब्ररी पतियाला ग्रंथलयांत, " दादू दयाल जी की अनमै वाणी " ( संवत् १७५५ ), आणि " सर्वंनी तथा संतवाणी " ( सं. १८५३ ) या हस्तलिखित प्रतींत; ( आ ) काशी येथील नागरी प्रचारिणी सभेच्या ग्रंथालयांत दादूपंथी संत रामदास यानें मंडोली येथें लिहिलेली ( १ ) " स्वामी दादू दयाल की वाणी " ( २ ) राजस्थान मधील दादू पंथी बाबा जगन्नाथ ' याचा शिष्य खुशालीराम यानें लिहिलेली, " सिद्ध-नाथ और संतोंकी बनियाँ " आणि ( ३ ) रामगढ येथें दादूपंथी साधू ज्ञानदास यानें लिहिलेली " दादू दयाल की वाणी तथा अन्य सन्त " या प्रतींत नामदेवाची पदें आणि साक्या आहेत. कालदृष्टया पाहतां नागरी प्रचारिणी सभालयांतील पहिली प्रत सं. १७७१ मध्यें लिहिलेली, दुसरी प्रत सं. १८३६ त लिहिलेली प्रत सं. १८७२ या सालांत लिहिलेली आहे. या तिन्ही प्रतींच्या शेवटीं ज्या पुष्पिका लिहिलेल्या आहेत त्या या लेखासोबत जोडलेल्या परिशिष्टांत दिल्या आहेत. ( इ ) पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयांत सं. १८६८ त लिहिलेली निरंजन शाखेच्या "सन्त वाणी सब्द संग्रहां"च्या प्रथम भागांत आणि सं. १८६५ मध्यें लिहिलेल्या " दादू दयाल की वाणी"च्या दुसऱ्या भागांत म्हणजे रज्जबजीच्या सर्वंगीमध्यें नामदेवांची रचना मिळते. ( ई ) घोमानचे बाबा लक्ष्मणदास यांचे पुत्र बाबा बलवंतराव यांचे संग्रही नामदेव पदांची एक प्रत आहे. ती अंदाजे २०० वर्षांपूर्वी लिहिलेली आहे, असें बाबाजींचे म्हणणें आहे. ( उ ) पंढरपूर निवासी वै. तुकाराम नानाजी निकते यांच्या संग्रहांत इ. स. १९५५ पर्यंत नामदेवांच्या अभंगांची पोथी होती. वै. निकतें यांच्या मतानुसार ही प्रत सुमारे २०० वर्षांपूर्वीची, कदाचित् थोडे अगोदरची होती ( ऊ ) याखेरीज जोधपुर निवासी श्रीउदयभानुदेव यांजकडील हस्तलिखित प्रतींत नामदेवांची २०० पदें व १५ साक्या व कांहीं श्लोक मिळतात.

## प्राचीन प्रतींची वैशिष्ट्यें

पतियाला ग्रंथालयातील " दादू दवाल जी की अनमै वाणी " या हस्त-लिखितांतील पत्रांक २१२ ते २२४ मधें आढळणारी नामदेवांची रचना–संहिता खूप जुनी आणि भाषादृष्ट्या सर्वांत प्राचीन पाठ देणारी आहे. या प्रतींतील नामदेवांची १२८ पदें मुद्रित व अमुद्रित प्रतींत सांपडतात. या प्रतींतील नामदेवांची रचना आणि पुणे विद्यापीठाच्या ग्रंथालयांत मिळणारी " दादू दयाल की वाणी " या मधील दुसऱ्या भागांतील रज्जबजींच्या सर्वंगीत विखुरलेली नामदेवांची रचना यांत भाषेच्या दृष्टीनें विलक्षण साम्य आहे. त्यांत विष्णुदास नामा अशी नाममुद्रा असलेली ३ पदें मिळतात. या दोन्ही प्रती पाठभेदाच्या अभ्यासाला अत्यंत उपयुक्त आहेत त्यांतील

भाषा विशेष चिंतनीय असून हिंदी भाषेच्या अभ्यासकांना या प्रती फार महत्वाच्या आहेत. हे पुढील उदाहरणावरून लक्षांत येईल.

( अ ) ( १ ) प्रथम पुरुषी, एकवचनी वर्तमान कालाची रूपे औकारान्त आहेत. उदा०—कथौं, करिहौं, करौं, चाषौं, चरचौं, जांनौं, नुहारैं, देहौं, मापौं, मरिहौं, लेहौं, विसारौं, हारौं इत्यादि ( २ ) ब्रजभाषेतील प्रथम पुरुषी एकवचनी हौ चा सर्वत्र प्रयोग,

( ३ ) प्राचीन ब्रज भाषेतील सौं या अव्ययाचा प्रयोग सर्वत्र आढळतो.

( आ ) आरंभीं अगर शेवटीं येणाऱ्या न च्या जागीं ण चा प्रयोग जसें— आंण, आसण, जाणौ, नीसाणं, न्हाण, पाणी, पहिरण, सिंन्नाणा, सुणि, सुमिरण इत्यादि.

( इ ) इ च्या जागीं य चा उपयोग, जसे—गोब्यंद, प्यंड, यंद्र, स्यंध इत्यादि.

**तीन परंपरा**

प्रस्तुत ग्रंथांत नामदेवासंबंधी उपलब्ध झालेल्या पोथ्या तीन परंपरांत विभागता येतात. पहिली मराठी गाथा परंपरा, दुसरी गुरुग्रंथपरंपरा आणि तिसरी भिन्न भिन्न स्थानीं मिळालेल्या पोथ्यांची परंपरा अशा तीन परंपरांतील पोथ्यांचा या संग्रहांत पाठभेदासाठी उपयोग केला आहे. या पदावलीतील या १० प्रतींचे पाठ संकलन पाहिले तरी या कार्याची व्यापकता लक्षांत येते. या निरनिराळ्या उपलब्ध प्रतींच्या पाठाधारें प्रस्तुत पाठसंशोधित आवृत्ति सिद्ध केलेली आहे.

**पाठ संशोधनाच्या पद्धती**

प्राचीन ग्रंथाच्या अभ्यासास मूलभूत संशोधित पाठांची आत्यंतिक आवश्यकता असते. या दृष्टीनें या ग्रंथांतील पाठांचा विचार करीत असतांना संपादकांनी कोणत्या कसोट्यांच्या आधारें हे पाठ स्वीकारले याचा विचार करणें दृष्टीनें उद्बोधक ठरेल. सर्व प्रतीत जो पाठ समानरूप आहे व जो अधिकाधिक प्रतीत आढळतो आणि जेथें एका प्रतींत एक पाठ असून व दुसऱ्या प्रतींत दुसरा पाठ असून अर्थदृष्ट्या दोन्ही पाठ बरोबर आहेत तेथें नामदेवांच्या भाषेची धाटणी, तत्कालीन भाषासरणी, अभिप्रेतार्थ आणि रचनाकालीन परिस्थिती लक्षांत घेऊन पाठांची योजना केली आहे. लिपिभ्रमानें निर्माण झालेल्या पाठांतून खरा पाठ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. लिपिकरांना मराठी भाषेचें ज्ञान नसल्यानें मूळ मराठी शब्दास जुळते-मिळते हिंदी शब्द त्या जागीं लिहिल्यामुळें अशुद्ध पाठ उद्भवले आहेत. जे व्याकरण दृष्ट्या योग्य पण मूलभूत पाठास जवळचे वाटतात ते पाठ ठेवण्यात आले आहेत. नामदेवांच्या भाषेतील अपभ्रंश रूपांचाहि विचार करण्यात आला आहे. उदा० कृष्ण शब्दाची भिन्न भिन्न रूपें पहा—क्रिसन,

करसन, करसण, क्रिस्न. पाठनिर्णय करताना नामदेवांच्या साहित्यांतील भाषा विशेष, विशिष्ट प्रयोग पद्धती, अर्थ व रूप यांचा विचार करून मूळ पाठासमीप येतील अशा पाठांची निवड केली आहे. आतां आपण दुसरी बाजू पाहूं.

**अर्थहीन पदच्छेदन—**

प्रस्तुत आवृत्तीच्या संपादकांनी मूळ पाठ—संशोधनासंबंधी वरीलप्रमाणें धोरण स्वीकारूनहि प्रत्यक्षांत त्यांत पदच्छेदनदृष्ट्या आणि अर्थनिश्चितीच्यादृष्टीनें कांहीं चुका केल्या आहेत. प्राचीन पोथ्यांत शब्द तोडून लिहिण्याची पद्धति नव्हती. त्याचा परिणाम वैकल्पिक पदच्छेदन अनेक स्थळीं होऊन नवीन पाठभेद निर्माण होतात. दुर्दैवानें महाराष्ट्रांतील पंढरपूर प्रतीतील पाठ ठरवितांना जे पदच्छेदन संपादकांनी केले आहे ते यथार्थ म्हणतां येणार नाहीं. उदाहरणार्थ—

(१) पदांक १८० मधील दुसऱ्या ओळीतील ग्राह्य धरलेला पुढील चरण पहा—

राजहंस चाली कोणसी कवीला ।

(पान ८६, पद १८०)

यांतील ‘कोणसी कवीला’ असा पदच्छेद केल्यानें कांहींच अर्थबोध होत नाहीं. या चरणांतील पदे पुढीलप्रमाणें तोडली तरच अर्थबोध होतो.

राजहंस चाली कोण सीकवीला ।

(राजहंसाला चालण्याची क्रिया कोणी शिकविली ?)

या पदांतील दुसऱ्या चरणांतील अंत्य भाग संपादकांनीं असा दिला आहे:—

पै लासी थाना डीट कोणै केला

(पान ८६; पद १८०-२)

कितीहि विचार केला तरी वरील ओळींतून कांहीं अर्थ निघत नाहीं पंढरपूर प्रतींत हा चरण असा लिहिला आहे:—

पै सिंहाला डीट कोणै केला ।

(पान ८६. पद १८०)

(परंतु सिंहाला धैर्यवान् कोणी केले ?)

पाठभेदांच्या कसोट्यांचे विस्तारानें विवरण करणारे डॉ. मिश्र व डॉ. मौर्यसुद्धां “लासी” “थाना” असले अर्थहीन पाठ देऊन स्वतःच अपपाठ निर्मितीला या ठिकाणीं बळी पडले आहेत असेच म्हणावे लागते.

( ३ ) वरील पदांतील ४ थे चरण पाहण्यासारखे आहे—

सुरे अथी कोकीला पै सीत बीनानई वैर साला ॥

( पान ९६, प. १८०–४ )

या ठिकाणीं नामदेवांना असे म्हणावयाचे आहे कीं, कोकीळेला सुरावर कोणी गावयास लावले ? पाऊसाशिवाय नदी वाहते कशी ? इत्यादि. आतां हा अर्थ वरील पाठांतून निघतो का ? " वैर सालां " असा पाठक्रम पाहून तर हसूं आल्याशिवाय राहत नाहीं.

परंपरा व प्रथा माहित नसल्यानें कसे अनर्थ होतात याची सहज कल्पना येते. शुद्ध पाठ " वैर साला " नसून " बरसाला " आहे.

( बरसना–( अ. क्रि. ) बरसना ( हिंदी ),–पाऊस पडणें, वर्षा होणे या अर्थी)

**सार्थ व विश्वसनीय पाठ हवेत**

( ४ ) राम बोले राम बोले राम बिना को बोले रे भाई ॥

( पान ३–पद ६ स. ना. हिन्दी पदावली )

प्रत्येक शरीरांत बोलण्याची क्रिया ईश्वरच करतो, हे नामदेवरायांना सांगावयाचे आहे; पण या कडव्यांत हाच नेमका अर्थ व्यक्त होत नाहीं. ईश्वराशिवाय स्वतंत्रपणें कोणी शरीरधारी बोलत नाहीं हा अभिप्रेत अर्थ लक्षांत घेता आदिग्रंथांतील पुढील पाठ अन्वर्थक पाठ वाटतो—

सभै घट रामु बोलै रामा बोलै ।

राम बिना को बोलै रे ॥

( ५ ) प्रणवत नामा भये निहकामा

तुम ठाकुर मै दासा ॥

( पान—३, पद ६–२ )

विषयांत गुंतलेल्या मनाला सतत वेगळे करून अनंतत्वांत स्थिर केले तर सर्व आशा, ईच्छा अस्तंगत होतात. शरणागत नामदेव म्हणतात कीं, मी निष्काम झालो आहे. ईश्वर कोण ? आणि भक्त कोण ? आतां तूं स्वामी व मी सेवक किंवा तूं ईश्वर आणि मी तुझा भक्त असा वेगळा भाव राहिला नाहीं, असें पद्याचा पूर्व भाग वाचून लक्षांत येते. हा भावार्थ संपादकांनीं दिलेल्या वरील चरणात स्पष्ट होत नाहीं. नेमका वरील अर्थ आदिग्रंथांतील पुढील चरणांत व्यक्त होतो.

प्रणवत नामा भये निहकामा

को ठाकूर को दासा रे

( तब था चेरा अब भये रानां

( पान ५, पद ११–२ )

जेव्हां ईश्वरी कृपा झाली तेव्हां अशी जाणीव झाली कीं, हा सेवक तत्क्षणी स्वामी झाला असें नामदेवरायांना म्हणावयाचे आहे. या कडव्यामधील 'था' च्या ऐवजी 'या' ही मुद्राराक्षसाची चूक म्हणून एक वेळ सांगता येईल; पण 'या' हे व्रजभाषेत संकेत वाचक निकटवर्ती सर्वनाम आहे आणि हाच पाठ पंढपूर प्रतींत आहे, 'था' नाही

(७) प्रणवंत नामा राम सहेटा

(पान ६, पद–१४–३)

या चरणांतील 'सहेटा' या शब्दाचा अर्थ सहेत, सप्रेम असा संपादकांनीं दिला आहे. प्रेमीजनांच्या भेटीची निश्चित व निर्दिष्ट स्थान, संकेतभवन असाहि अर्थ शब्द–कोषांत आहे. पंढरपूर प्रतींत सहेरा असा शब्द आहे. तो सोयरा या मराठी शब्दाचे लिपिभ्रमानें लिहिलेले रूपांतर वाटते. सोयरा शब्द घेतल्यास पुढील अर्थ होतो. त्या रामरूपी सोयऱ्याला नामदेव वंदन करतात. मराठी परंपरा पाहतां देवाला सोयरा म्हटल्याची अनेक उदाहरणें आहेत. उदा० 'नामा म्हणे केशवा तूं माझा सोयरा' यापूर्वींच्या कडव्यांतील 'भेटा' या अंत्य शब्दाशी एकाक्षरी यमक साधण्यासाठी 'सहेटा' शब्द नकल करताना घेतला जाण्याचीहि शक्यता आहे. पण मग अर्थाबद्दल काय करावयाचे ?

(८) आपै सुरति आपै सूत्रधारी

(पान १७, पद–४०–२)

वरील पाठांतील 'सुरति' शब्दाचा अर्थ ध्यान असा आहे. हा अर्थ घेऊन या चरणाचा अर्थ बरोबर लागत नाही. पंढरपूर प्रतींत 'सुरती' च्या ऐवजी (सूत्र' असा पाठ आहे. तो पाठ घेतला म्हणजे पुढील अर्थ घेतो (परमेश्वर) आपणच सूत्र आणि सूत्रधार आहे.

(९) तुम्हारी सरनि मैं भाजि
दुरयौ है बंदि छेडि बाबा बीठुला

(पान २२, पद–५३–३)

या चरणांतील 'भाजि' या पाठा ऐवजी 'भजि' (भजना–आश्रय लेना) असा पाठ पंढरपूर प्रतीत आहे. आणि तोच योग्य वाटतो. तसा पाठ घेतल्यास त्यातून निघणारा अर्थ असा—

मी तुला शरण आलो आहे, मी तुझा आश्रय घेतलेला आहे. अनंत कालापासून मी बद्ध आहे. हा दुर्योग (कुयोग) आहे. म्हणून बाबा विठ्ठला ! मला सोड.

( १० ) लोहा तांबा बंदन कीहां
पाय परी है बेरिया।

( पान—३०, पद ६८—१ )

वरील चरणांतील, 'तांबा' हा अपपाठ वाटतो. पंढरपूर प्रतीत त्याऐवजी 'ताला' पाठ पहाण्यात आला आहे आणि अर्थांच्या दृष्टीने तो योग्य वाटतो पहा—

लोखंडाच्या कुलुपानें बंद केलेली बेडी पायात पडली असा सरळ अर्थ होतो. असे अनेक अपपाठ दाखविता येतील. असो.

तेराव्या शतकांत जी भाषा रूढ होत होती त्या ब्रजभाषेचे नामदेव हे एक मुख्य शिल्पकार होते. त्यांच्या हिंदीवर त्या काळच्या प्रचलित बोलींचा परिणाम स्पष्ट दिसतो, जनतेचा उद्धार हे एकच ध्येय सतत डोळ्यांपुडे असल्याने ते स्वतः व त्यांची भाषा प्रादेशिकतेच्या मर्यादेत अलिप्तपणे गुरफटलेली नाही,त्यांच्या भाषेने प्रसंगानुसार कधीं मराठीची, कधीं हिन्दीची, कधीं राजस्थानीची, कधीं गुजराथीची, कधीं अपभ्रंश भाषेची कधीं संस्कृतची प्रकृती स्वीकारली असल्यास नवल ते काय? जसे विचार सुचले तसे व्यक्त करण्यासाठी तत्कालीन लोकभाषेच्या प्रकृतींत जे जे सामावूं शकले त्या त्या सर्वांचा त्यांनीं भक्तिप्रचारासाठी उपयोग केला. पुष्कळसे देशी शब्द, देशी वाक्प्रयोग व गाण्यास योग्य अशा रागांत रचना नामदेवांनीं केली. तशी पूर्वींच्या हिंदी ग्रंथांत तितक्या प्रमाणांत उपलब्ध होत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां हिंदी काव्यवाङ्मयाच्या इतिहासांत नामदेवांची कविता हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. वरील कांहीं दोष व मतभेद मान्य करूनही ही पदसंग्रहाची संपूर्ण आवृत्ति उपयुक्त आहे यांत सुतराम् संदेह नाहीं.

## परिशिष्ट

१ ) "स्वामी दादू दयालकी वाणी" या प्रतीच्या शेवटीं पुढील पुष्पिका आहे—

स्वामी दादू प्रगटे मान जग मांहि जिहाज ।
तिनके साधू जी भये सब विधि पूरन काज ॥
तिनके सिष्य मनोहर दासजी ग्यान भक्ति प्रकास ।
तिनके सिष्य श्री षेमजी जिनके अनभौ उल्हास ॥
तिनके सिष्य प्रगट सही भगवान दास जी नाम ।
प्रेम प्रीति सौ. हरि भजै हिरदै हरि कौ नाम ॥
रामदास सिष लेषत सोई । पुस्तक लिख्यौ बनाई कै सोई ॥
भक्त भंडार पुस्तक यहु कहिये । पत्र आठ सै यामे लहिये ॥

बाबाजी श्री संतजी, हिरदै प्रेम अपूर।
आग्या यहु मैं पाय करि; तिनकौ लिष्यौ हुजूरि॥
पुस्तक अद्भुत हू लिष्यौ पढयौ सुहोय प्रसन्न।
जी चाहै सुकादि ल्यौ ऊदधि भरे रतन॥
सत्रह सै इकहत्रया सही। संवत पूसि सुधि सोलही॥
ब्रसपतिवार पंचमी होई। ता दिन भयो संपूर्ण सोई॥
नग्र मठोडी माज जु होई। ता दिन भयौ संपूर्ण सोई॥
बाचैं पढैं सुनैं जे कोई। राम राम वंचिज्यो सब कोई॥ (पृ. ५६)

(२) "सिद्धनाथ और संतोकी बानियाँ" या पोथींत समाप्ती—सूचक पुढील ओळी आहेत :—

"रामजी सति। संवत् १८३६ वि. जेठ मासे सुक्ल पषे तिथ १० वार मंगलवार सुभ ता दिन पोथी संपूरण, सुभ स्थान राणीला मध्य पोथी लिपि पुरयाली राम पोथी लिषी बांचै बिचारै तिनको राम राम॥" पृ. ५६

(३) "दादू दयालकी वाणी तथा अन्य सन्त" या पोथींत नामदेवांची पदें लिहून झाल्यानंतर लिपिकारानें पुढील टिपण लिहून ठेवले आहे :—

"इति श्री नामदेव जी कौ क्रित संपूरण भवेत। अथ श्रीनामदेव जी कौ जोड मांड्यौ १३६॥ अथ राग॥१७॥

आणि पोथी संपूर्ण लिहून झाल्यानंतरची पुष्पिका याप्रमाणें:—

"संवत् १८७२ पोष सुदी ११ लिषितं बाबा जी श्री दयाराम जी तिनका सिष श्री संतोषदास जी, तिनिका सिषि श्री लालसदास जी तिनिका सिष श्री बालकिसन दासजी, नितिका श्रित षानाजाद गुलाम ज्ञानदास लिषितं॥ रामगढ सथाने श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री। सुंदरदासनी कै सथान पोथी संपूर्ण भई॥"

(पृ० ५६)

# कल्याणकारी कथा

**निवेदक : पूज्य विनोबा भावे**

**आगगाडी**

शिटी वाजली आणि गाडीनं फलाट सोडला. तरीसुद्धा प्रवासी धावत होते आणि गाडीचा हाती सांपडेल तो भाग पकडून गाडीत चढत होते. या गर्दीत शेठ मथुरालाल आणि त्यांचे दोन सोबती होते. डब्याचा दरवाजा उघडून हे तिघेजण आत शिरताच डब्यातील प्रवासी ओरडून म्हणाले,

" पुढच्या डब्यात जा. तिथं खूप जागा आहे. "

" आता काय उपयोग ! गाडी तर सुटली आहे. दुसऱ्या डब्यात आम्ही तीन माणसं कशी जाणार ! थोडी जागा द्या. उभ्याउभ्या प्रवास करू. "

असं म्हणून ते तिघंहि आंत घुसले. एका बाकावर कोणीएक प्रवासी पाय पसरून अस्ताव्यस्त झोपला होता. त्याला ते म्हणाले,

" भाऊसाहेब, जरा पाय जवळ घ्या. आम्हाला बसता येईल. "

वास्तविक पसरलेला प्रवासी जागा होता, पण त्यानं डोळे मिटून घेतले. त्यानं यांचं ऐकलं न ऐकलंसं केलं. हे सारं पाहून मथुरालालचा सोबती जरा गरम झाला. म्हणाला,

" हें काय ! इथं माणसं उभी असतांना पाय पसरून झोपला आहात ! गाडी काही तुमची एकट्याची नाही म्हटलं. "

झोपणारा प्रवासी शांतपणे म्हणाला,

" बसायचं होतं तर जरा आधी का नाही आलात ! "

" आम्ही उशीरा आलो म्हणून काही गुन्हा केला नाही. तिकीट आपण घेतलं तसं आम्हीहि घेतलं. झोपायचं होतं तर डबा राखून ठेवायचा होता. इथं सर्वांनाच बसण्याचा अधिकार आहे. आधी आलात म्हणून पुऱ्या बाकाचा अधिकार आपणास मिळाला नाही. जरा समजूतदारपणानं काम घ्या. उठून बसा. नाहीतर हात धरून उठविलं जाईल. "

झोपलेला प्रवासी कडवट तोंड करून उठून बसला.

गाडीनं पुढलं स्टेशन काठलं. पुन्हा प्रवाशांचा एक तांडा डब्यात घुसण्यासाठी पुढं आला.

मथुरालाल किंचाळून म्हणाला,

" इथं जागा नाही. पुढं जा. "

परंतु मथुरालालच्या ओरडण्याची पर्वा न करता तो तांडा आत घुसला. मथुरालाल आणि त्याचे सोबती हातपाय ताणून अधिक जागा ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. इतक्यात नव्या तांड्यातला एक तरुण गडी तिखट आवाजात म्हणाला,

" इतके सारे लोक उभे असतांना आरामात बसण्याची तुम्हाला लाज कशी वाटत नाही ! "

मथुरालालचा एक सोबती म्हणाला,

" काय म्हणालास ! आम्ही आधी आलो. तसा तूं का आला नाहीस ! "

" आम्ही काही फुकटात आलो नाही. तिकिटांचे पैसे खर्चून डब्यात चढलो आहोत. जरा समजूतदारपणानं काम घ्या. आवरून बसा. नाहीतर धक्के मारून काम घ्यावं लागेल. "

शेवटी काम तालावर आलं आणि थोडी सरकासरकी होऊन नवीन प्रवाशांना जागा मिळाली.

अशा गोष्टी रोज घडतांना आपण पाहतो. असं का होतं ! जेव्हां प्रवासी डब्यात चढणारा असतो तेव्हा त्याचा स्वभाव वेगळा असतो आणि जेव्हा तो डब्यात बसलेला असतो तेव्हा मात्र त्याचा स्वभाव वेगळा असतो !

विनोबा म्हणतात, माझी पदयात्रा एवढ्यासाठी म्हणजे माणसामाणसात रुजलेली ही विकृत मनोवृत्ति थांबविण्यासाठी आहे !

● ●

## जीवनलाल

जीवनलाल हा एक लहानसा शेतकरी आहे. पण उदार आणि प्रेमळ.

जीवनलालला दोन भाऊ होते. तेहि शेतकरीच होते. जीवनलाल आपल्या शेतीत मेहनत करायचा. त्याचे भाऊ त्यांच्या शेतीत मेहनत करायचे.

परंतु एक दिवस वाईट प्रसंग घडला आणि जीवनलालचा धाकटा भाऊ वेडा झाला. जीवनलालनं त्याला आपल्या घरी आणलं. त्याची शेती स्वतः कसायला लागला. जीवनलाल सतत चिंता वहायचा. आणि धाकट्या भावाला व त्याच्या मुलाला त्रास होणार नाही याची काळजी घ्यायचा.

या दुर्घटनेवरून दोन वर्षे जातात न जातात तोंच त्याचा दुसरा भाऊ देवाघरी

गेला. या भावाचं कुटुंब मोठं होतं. जीवनलालनं कुटुंबांतील सर्व माणसांना हिंमत देत म्हटलं,

"घाबरू नका. लवकरच मुलं मोठीं होतील आणि आपल्याला सुखाचे दिवस दिसतील. तोपर्यंत मी तुमची शेती कसतो."

जीवनलालची बायको एक वर्षापासून सतत आजारी होती. कामाच्या भारामुळं जीवनलालचा एक हात कामातून गेला होता. इतकं असूनसुद्धा तो आपल्या भावांची शेती कसायचा. आणि सर्वांना सांभाळायचा.

जीवनलालचं हें केवढं थोरपण होतं!

नवनीतलाल जीवनलालबद्दल सहानुभूति बाळगणारे एक गृहस्थ होते. ते जीवनलालला वेळोवेळी भेटत आणि शेतीविषक सल्ला देत. त्याची विचारपूस करीत. एकदा जीवनलालच्या शेतीबद्दल विषय निघाला असतां नवनीतलालनं म्हटलं,

"जीवनलाल, यावेळी तुझी शेती मागं का?"

जीवनलाल म्हणाला,

"धाकट्या भावांची शेती अंगावर पडली. त्यामुळं जरा माघारलो. परंतु माझी हिंमत खचलेली नाही. लोकांच्या तुलनेत माझी शेती फारच मागासली ठरणार नाही." आणि आपल्या हातातलीं मक्याचीं हिरवीं कणसं नवनीतलालच्या हातावर ठेवीत तो म्हणाला,

"भाजून खा. विसरू नकोस."

नवनीतलालनं विचारलं, "तूं खाल्लेस का पण?" जीवनलाल म्हणाला,

"नाही. मी तुझ्यासाठीं आणलींत तीं. तुला दिल्याशिवाय मी आधी कसा खाणार! अजून गावांत कुणाचाच मका तयार झाला नाही. मला मुलंबाळं आहेत, तशीं गावातहि आहेत. त्यांना दोन दोन कणसं दिल्याशिवाय मी खाणार नाही. सर्वांना मका मिळेल तेव्हाच मला खाण्याची मौज लुटता येईल ना!"

जीवनलालचा हा समजूतदारपणा किती खोल! आणि दिलदारपणा कसा जगावेगळा आहे!

* * *

## सोन्याची माया

एकदा भगवान् विष्णु आणि लक्ष्मी यांच्यात वाद झाला. विष्णु म्हणाले, लोक माझे भक्त आहेत. लक्ष्मी म्हणाली, लोक माझे भक्त आहेत. वाद मिटायचं चिन्ह दिसेना. शेवटी परीक्षा पाहून निर्णय घेण्याचं निश्चित झालं.

भगवान् विष्णूंनी एका ब्राह्मणाचा वेष धारण केला आणि एका गावात आले. गावात एक महादेवाचं मंदिर होतं. त्याच्या पडवींत हे ब्राह्मणरूपधारी विष्णु पोथी वाचीत बसले. ब्राह्मणाचा मधुर आवाज आणि भक्तिज्ञानयुक्त कथा ऐकायला लोक

झुंडींनीं मंदिरात आले. दररोज ब्राह्मण सुंदर सुंदर कथा सांगत आणि दररोज माणसांची गर्दी वाढत राही. होता होता सारा गाव कथा-श्रवणाला येऊ लागला.

लक्ष्मीनं विचार केला की आता भगवान् विष्णूला खरं काय ते कळू दिलं पाहिजे. मग तिनं एका म्हातारीचं रूप घेतलं आणि ऐन कथेला जाण्याच्या वेळी एका स्त्रीला गाठून म्हटलं,

" बाई, थोडं पाणी देतेस ? "

म्हातारीला भलत्या वेळी पाणी मागतांना पाहून त्या स्त्रीनं तोंड वाकडं केलं आणि झटपट घरात जाऊन म्हातारीसाठी एक भांडं पाण्यानं भरून आणलं. भांड्याला म्हातारीचा हात लागताच ते भांडं सोन्याचं झालं. हा चमत्कार पाहून त्या स्त्रीनं विचारलं,

" आई, तूं कुठं थांबलीस ? "

" तलावाजवळच्या धर्मशाळेत." म्हातारी म्हणाली.

तलावाजवळच्या धर्मशाळेत उतरलेल्या म्हातारीचा हात लागताच वस्तु सोन्याची होते ही वार्ता लवकरच गावभर पसरली. त्यानंतर कथा–निरूपणाच्यावेळीच ती म्हातारी गावात फिरू लागली. गावच्या साऱ्या स्त्रिया त्या म्हातारीला आपापल्या घरी नेऊ लागल्या. सोन्याच्या लोभानं घरातली भांडी तिच्या हातात देऊ लागल्या.

इकडे कथेला बायका कमी आहेत हें कथाकारबुवांच्या लक्षात आलं. कोणीतरी म्हटलं,

" गावात पितळेचं सोनं बनवणारी एक म्हातारी आली आहे. साऱ्या बायका तिच्या स्वागतात दंग आहेत. "

दुसरे दिवशी कथेला पुरुषसुद्धा कमी दिसू लागले. कारण आता म्हातारीनं नवी अट पुढं केली होती, कुटुंबातली सारी माणसं हजर असतील तरच मी पितळेचं सोनं करीन असं तिनं साऱ्या बायांना सांगून टाकलं होतं. आणि बायकांनी पुरुषांना कथेत जायला मनाई केली होती.

अखेर कथाकारबुवा मंदिराच्या पडवीत एकटेच उरले. त्यांनी कथा सांगणं बंद केलं आणि निघून गेले. त्यानंतर लक्ष्मीनेंहि आपलं रूप बदलवलं आणि विष्णूजवळ निघून गेली. तिनं हसत विष्णूला म्हटलं,

" पाहिलंत, लोक सोन्यासाठीं कसे बावळट बनतात ते ? "

आजहि असंच चालू आहे. सोन्याच्या मायेत लोकांना देवाचासुद्धा विसर पडला आहे. देवाचा विसर म्हणजे स्वतःचा विसर, आत्मस्वरूपाचा विसर.

विनोबा म्हणतात, यावर एकच उपाय आहे. आत्मशक्तीचें ज्ञान झाल्याशिवाय माणूस कधींच सोन्याला विसरूं शकणार नाहीं.

---

# श्रीपाद-श्रीवल्लभ

*******************

कृते जनार्दनो देवः त्रेतायां रघुनंदनः ।
द्वापारे रामकृष्णौच कलौ श्रीपादवलभः ॥ १ ॥

सध्यांच्या तामीळनाड अथवा मद्रास राज्यांतील ' पीठापुरम् ' अथवा पीठापुर नांवाच्या गांवांत * सुमारें ५०० वर्षांपूर्वी ' आपळ राजा ' नांवाचा आपस्तंब शाखेचा उत्तमवंशी ब्राह्मण राहत होता, त्याच्या बायकोचें नांव ' सुमता ' असें होतें. तो पतिव्रताधर्मानें वागून अतिथि-अभ्यागतांची मनोभावें पूजा करीत असे.

एकदां अमावस्येच्या दिवशीं त्यांच्या घरीं श्राद्ध होतें. श्री दत्तात्रेय अतिथिरूपानें सकाळींच त्यांच्या घरीं आले. ' सुमते ' ने ब्राह्मणांची जेवणें होण्यापूर्वीच त्यांना भिक्षा घातली. श्री दत्तात्रेय तिच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनीं तिला वर दिला कीं ' तुला असा पुत्र होईल कीं जो तुझ्या वंशाला उद्धरील. मात्र तो तुमच्याजवळ ज्यास्त काल रहाणार नाहीं. '

* राजमहेंद्रीच्या उत्तरेस गोदावरीच्या मुखप्रदेशाजवळ आजही या गांवांतील कांहीं ब्राह्मण ' श्रीपाद ' या आडनांवाचेच आहेत. श्री टेंब्येस्वामींनीं श्रीपाद श्रीवल्लभांचें जन्मस्थान शोधून काढून तिथें पादुकांची स्थापना केली आहे.

यापूर्वी या दांपत्यालापुत्र झाले होते. पण त्यांतले कांहीं उपजतांच मृत्यु पावले होते, तर जे वांचले ते आंधळे, पांगळे निपजले होतें, म्हणून सुमतेनें श्रीदत्त प्रसन्न झाल्यावर त्यांच्याकडे असा वर मागितला होता कीं " मला पुत्र असा पाहिजे कीं तो ज्ञानवंत, पुराणपुरुष, जगद्वंद्य, वेदसदृश, थोडक्यांत म्हणजे तुमच्यासारखा असावा ! " असो.

पुढें यथाकाल सुमता गर्भिणी होऊन तिला पुत्र झाला, तेव्हां त्याचें नांव श्रीपाद असें ठेविलें.

सात वर्षांचें वय झाल्यावर त्या ब्राह्मणानें श्रीपादाचें मौंजीबंधन ( मुंज ) केलें आणि चमत्कार असा कीं मुंज होतांच तो ब्रह्मचारी चारही वेद, मीमांसा, तर्क वगैरे शास्त्रें अति उत्तम म्हणूं लागला. सर्वांना आश्चर्य वाटलें. जो तो म्हणूं लागला, " हा अवतारी पुरुष आहे ! "

वयाची १६ वर्षें झाल्यावर आईबापांनीं श्रीपादाच्या लग्नाचा विचार चालविला, तेव्हां श्रीपादानें आपलें खरें स्वरूप दांखविलें. आणि मातापितरांना सांगितलें, " माझी

स्त्री विरक्ति ही आहे व बाकी सर्व स्त्रिया मला मातेसमान आहेत. माझें नांव श्रीपाद-वल्लभ असें आहे. ज्ञानमार्गासाठीं मी लौकरच बाहेर पडणार आहे. ”

आईबापांना मागची आठवण झाली. पण लोभ कांहीं सुटेना. ती म्हणाली, “ तूं आमच्या वृद्धापकाळीं प्रतिपाळ करशील अशी आशा होती ती नष्ट झाली की रे ! ”

श्रीपाद श्रीवल्लभांनीं त्यांना हात धरून उठविलें. जवळच त्यांचे दोघे भाऊ एक आंधळा नि दुसरा पांगळा असे होते. त्यांच्यावर त्यांची अमृत दृष्टि जाताच आंधळ्याला दिसूं लागलें आणि पांगळ्याला पाय आले ! त्यांनीं श्री. वल्लभांच्या पायांवर डोकें ठेविलें तेव्हां सद्गुरु त्यांना म्हणाले, “ तुम्हांला नातू-पणतू होऊन तुम्हीं सुखानें नांदाल. माता पित्यांची सेवा करा म्हणजे महा ज्ञानी व्हाल. ” मातापित्यांनाही त्यांनीं सांगितलें कीं, “ हे पुत्र शतायुषी होतील आणि वंशपरंपरा यांचेपाशीं अखंड लक्ष्मी राहील. ”

अशी सर्वांची निरवानिरव करून श्रीपाद श्रीवल्लभ तिथून काशी नगरी गेले. तिथें कांहीं दिवस राहून पुढें ते बद्रीवनाला गेले. तिथून तीर्थयात्रा करतां करतां गोकर्णक्षेत्रीं आले. तिथें तीन वर्षें राहून ते निवृत्तिसंगमाला आले. आणि तिथून कुरवपूर येथें जाऊन राहिले.

या कुरवपुरांतच एकदा ते गंगाकांठीं ( कृष्णेलाच गंगा म्हणतात ) स्नानास गेले असतां त्यांना सत्पात्र व विद्वान ब्राह्मणाचा एक मूढ मुलगा लोकनिंदेच्या त्रासानें गंगेंत जीव देण्यासाठी आलेला आढळला. त्याची विधवा आई-अंबिका—हीही त्याच्याबरो-बरच जलसमाधि घेणार होती. इतक्यांत श्रीपादवल्लभ तिथें आले. त्यांना तिनें वंदन करून प्राणत्यागाचा हेतूही सांगितला. आणि या जन्मी नाहीं, पुढल्या जन्मीं तरी तुमच्यासारखा दिग्विजयी पुत्र आपल्याला लाभावा अशी इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा श्रीगुरुदेवांनीं तिला आत्महत्त्येपासून परावृत्त करून ‘ शिवपूजा व शनिप्रदोषाचें व्रत करीत जा; म्हणजे तुझे मनोरथ पूर्ण होतील ’ असें सांगितलें आणि मुलाच्याही मस्तका-वर हात ठेवून त्यांनीं त्याला ज्ञानप्राप्ति करून दिली.

याच कुरवपुरांत एक परीट नित्य त्यांच्या दर्शनास येत असे. एक दिवस तिथें आलेल्या ‘ यवन ’ राजाचें ऐश्वर्य पाहून त्या परिटाला असें ऐश्वर्य आपल्याला लाभावें अशी इच्छा उत्पन्न झाली. श्रीपादयतींनीं त्याचा भाव ओळखून नि त्याची गुरुभक्ति पाहून त्याला ‘ पुढील जन्मीं तूं बेदर नगरींत बादशहाच्या पोटी जन्म घेऊन राजैश्वर्य भोगशील ’ असा आशीर्वाद दिला.

---

* कुरवपूर अथवा कुरगुड्डी हें पुणें-रायचूर मध्यविभाग लोहमार्गावरील कृष्णा स्टेशनवरून पुढें गेल्यावर कृष्णा नदीच्या खोऱ्यांत दाट अरण्यांत १२।१३ मैल आंत आहे.

पुढें कांहीं कालानें या कुरवपुरींच हे सद्गुरु श्रीपाद श्रीवल्लभ आश्विन व ॥ १२ मृग नक्षत्रीं ' निजानंदेंसीं बैसले ' आणि गंगेंत ( कृष्णा नदींत ) अदृश्य झाले ! आश्विन व ॥ १२ ला श्रीगुरुद्वादशी म्हणतात आणि त्या दिवशीं श्रीदत्तमंदिरांतून नि अनेक गृहस्थांच्या घरींही ही तिथि पुण्यपावन तिथि म्हणून साजरी केली जाते ती यामुळेंच.

* त्यावेळीं महाराष्ट्रांत बहामनी शहांचें राज्य होतें. अर्थात् हा राजा त्या वंशांतलाच होता.

## श्रीनृसिंह सरस्वती

कुरवपुरांत अदृश्य झालेले ' श्रीपाद श्रीवल्लभ ' यति पुढें कांहीं वर्षांनीं ' श्रीनृसिंह सरस्वती ' या नांवानें प्रगट झाले ती कथा पुढीलप्रमाणें :—

कुरवपुरीं ज्या स्त्रीला श्रीपाद श्रीवल्लभांनी शनिप्रदोषीं श्री शंकराची आराधना करण्यास सांगितले होतें, ती स्त्री कालौघांत पंचत्व पावल्यावर उत्तरेकडे ' करंज ' नगरी वाजसनेय शाखेच्या एका ब्राह्मण कुळांत जन्म पावली. तिचें नांव ' अंबाभवानी ' असें ठेवण्यांत आलें. पुढें ती लग्नाला योग्य झाल्यावर त्याच गांवांतील एका ब्राह्मणाच्या मुलाशीं तिचें लग्न झालें. त्याचें नांव ' माधव ' असें असून तो मोठा शिवभक्त होता.

या दांपत्याला पुढें मुलगा झाला. या मुलाचें नांव ' शालिग्राम देव ' असें ठेविलें. पण व्यवहारांत त्याला ' नरहरी ' म्हणत. या ' नरहरी ' च्या किंवा ' नरसिंहा ' च्या बालपणच्या लीलाही कौतुकास्पद होत्या. आईनें मुलाला अंगावरील दूध कमी पडते असें म्हणतांच या बाळाच्या केवळ स्तनस्पर्शानें बत्तीस धारा दूध वाहूं लागणें, पाळण्यांत फार वेळ न राहतां सदा जमिनीवर खेळणें, सात वर्षांचा होईपर्यंत ॐकाराशिवाय कोणताही शब्द न उच्चारणें, आणि सातव्या वर्षीं मुंज होतांच तिन्ही वेदांच्या पहिल्या ऋचा घडाघड म्हणून दाखविणें, लोखंडाच्या कांबीचें हस्तस्पर्शानें सोनें करून दाखविणें इत्यादि चमत्कारांनीं त्याचें बालपण सर्वत्र गाजलें होते.

मुंज झाल्यावर नरहरीनें तीर्थयात्रा करण्यासाठीं आईबापांची परवानगी मागितली. अर्थात् आईबापांना वाईट वाटलें. तेव्हां या बटु-संन्याशानें त्यांना जगाच्या नश्वरतेविषयीं नि संसाराच्या विफलतेविषयीं उपदेश केला पण मातेचें समाधान होईना. तिनें आणखी एक पुत्र होईपर्यंत तरी थांबण्याविषयीं त्यांची विनंती केली. तेव्हां तिचें म्हणणें मान्य करून श्रीगुरु एक वर्षपर्यंत त्या घरीं राहिले. या मुदतींत मातेला

* विदर्भांतील अकोला जिल्ह्यांत ' लाड कारंजा ' या नांवानें हे सध्यां प्रसिद्ध आहे. तिथें श्रींचें जन्मघर व त्याला लागूनच श्रींचे देवालय आजही पहावयास सांपडतें.

मुळे दोन मुलगे झाले. श्रीगुरुंनीं त्यांना आशीर्वाद दिला आणि मातेलाही आणखी दोन मुलगे नि एक कन्या होईल असें सांगून आणि "ज्या ज्या वेळीं तुम्ही माझें स्मरण कराल त्या त्या वेळीं मी तुम्हांजवळ येईन" असें आश्वासन देऊन मातापितरांचा निरोप घेतला; आणि ते काशीक्षेत्रीं तप करण्यासाठीं निघून गेले. या काशीच्या निवासांत मणिकर्णिकेच्या घाटावर त्रिकाल स्नान करणें, विश्वेश्वराची मनोभावें पूजा अर्चा करणें आणि साधुसंतांच्या नि तपस्वीजनांच्या सहवासांत ब्रह्मचर्योचित पद्धतीनें काळ घालविणें हा नरहरीचा नित्य क्रम होता. पुढें तिथेंच 'श्रीकृष्ण सरस्वती' या नांवाच्या वृद्ध संन्याशाकडून त्यांनीं विधिपूर्वक संन्यासदीक्षा घेतली, आणि तेव्हांपासून 'श्री नृसिंह-सरस्वती' या नांवानें ते ओळखले जाऊं लागले.

चतुर्थाश्रमाचा स्वीकार केल्यावर श्रीनृसिंह सरस्वती बदरिकाश्रमाला गेले व तिथून गंगातटाक-यात्रा करीत ते आपल्या जन्मग्रामीं म्हणजे 'करंज' नगरास आले. प्रयाग क्षेत्रीं असतां त्यांनीं अनेकांना संन्यासदीक्षा दिली. त्यांत 'माधवसरस्वती' हा त्यांचा अत्यंत आवडता व मुख्य शिष्य होता. असो.

या दरम्यानच्या कालांत 'करंज' नगरीं श्रीनृसिंह सरस्वतींच्या पूर्वाश्रमींच्या आईबापांना त्यांनींच वरदान दिल्याप्रमाणें आतां दोन मुलगे व एक कन्या झाली होती. त्या सर्वांना त्यांनीं दर्शन दिलें आणि कांहीं दिवस त्या नगरांत काढून ते तिथून नाशिकत्र्यंबकेश्वरला गेले.

नाशिक-त्र्यंबकेश्वराला थोडे दिवस राहून ते निघाले ते मंजरिका (वासर)-ब्रह्मेश्वर येथे गेले × आणि तिथून मग दक्षिणदेशीं वैजनाथ किंवा वैजेश्वर येथें जाऊन सुमारें १५ वर्षे गुप्तरूपानेंच त्या बाजूला हिंडत होते. या ठिकाणीं एकदां एका ब्राह्मणाला गुरुमाहिमा वर्णन करून सांगतांना महाभारतांतील धौम्यऋषि व त्याचे तिघे शिष्य यांची कथा त्यांनीं सविस्तर निवेदून कष्टांचें महत्त्व त्यांच्या मनावर बिंबविलें होतें.

× हें स्थान माहूरच्या दक्षिणेस गोदावरीच्या कांठीं नांदेड जिल्ह्यांत आहे.

वैजनाथ येथील आपलें कार्य आटोपून श्रीसद्गुरू 'भिल्लवडी' (भिलवडी) येथें आले × आणि तिथें औदुंबर वृक्षाखालीं त्यांनीं आपलें ठाण दिलें, आणि चातुर्मासांत मोठें अनुष्ठान केलें.

या कालांत करवीर नगरांतला विद्याहीनतेमुळें लोकांकडून तिरस्कृत असा एक ब्राह्मणाचा मुलगा फिरत फिरत भिलवडीस आला. आणि तेथील भुवनेश्वरी देवीसमोर धरणें धरून बसला. देवी प्रसन्न होईना, तेव्हां त्यानें आपली जीभ कापून देवीच्या पायांवर वाहिली, आणि 'अजूनही माझी उपेक्षा करशील तर माझें शिरच कापून

तुझ्या चरणीं समर्पण करीन ' असें त्यानें देवीला सांगितलें. पण त्या दिवशीं रात्रींच त्याला स्वप्न पडलें कीं कृष्णेच्या पश्चिम तीरावर औदुंबराच्या वृक्षाखालीं एक बालब्रह्मचारी आहे, त्याच्याकडे जा, म्हणजे तो तुझे मनोरथ पूर्ण करील. त्याप्रमाणें तो बालक श्रीनृसिंहस्वामीस भेटला तेव्हां त्यांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला त्याची जीभ नि सर्व विद्याही प्राप्त करून दिल्या.

कांहीं काल भिलवडीस काढल्यावर तिथून सद्गुरु करवीर प्रांतीं पंचगंगासंगमाजवळ येऊन तिथें बारा वर्षें राहिले. शिवा–भद्रा–भोगावती–कुंभी आणि सरस्वती या पांच नद्या ज्या ठिकाणीं श्रीकृष्णेला मिळतात, असें हें स्थान प्रयागापेक्षांही पुण्यपावन आहे. × हें स्थान पुण्याहून हुबळीकडे जाणाऱ्या लोहमार्गावर मिरजेच्या अलीकडे कृष्णाकांठीं आहे.

## साईभक्तांस सूचना

श्री साईबाबांचे ५० व्या पुण्यतिथीनिमित्त प्रचार कार्य म्हणून १४" × २३" आकाराचे तीन रंगी पोस्टर्स तयार केले आहेत. ज्या भक्तांना आपल्या भागांत प्रचारार्थ पोस्टर्स लावण्यासाठीं हवे असतील, त्यांनीं कृपया संस्थानचे मुंबई कचेरीशीं पत्रव्यवहार करून पोस्टर्स मागवून घ्यावे व प्रमुख जागीं बाबांचे कार्यास शोभेल अशा ठिकाणीं पोस्टर्स चिकटवून साई फौंडेशनच्या प्रचारास मदत करावी अशी विनंती आहे.

**पोस्टर्स विनामूल्य आहेत.**

ग्रंथ–परिचय

# श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## चरित्र आणि वाङ्मय

भारत आणि त्यांतही महाराष्ट्र ही संत महंतांची खाण आहे. या पुण्यभूमींत गेल्या सात आठशें वर्षांच्या काळांत असंख्य साधुसंत व साक्षात्कारी पुरुष होऊन गेले. फार कशाला! गेल्या शें पाऊणशें वर्षांच्या कालाकडे मार्गे वळून पाहिले तरी असंख्य साधुसंतांचीं नावें आपल्या दृष्टीसमोरून सरकन् जातात. ती संत परंपरा आजही अखंड चालू आहे. अक्कलकोटचे स्वामी महाराज, श्री. माणिक प्रभू, श्री. साईबाबा, अशीं अलिकडच्या काळांतील किती नावें सांगावीं! त्याच मालिकेत ज्यांची गणना करतां येईल असे सुमारें ५५।६० वर्षांपूर्वी होऊन गेलेले थोर साक्षात्कारी पुरुष श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे होत. ( १८४४ ते १९१३ ) महत् प्रयासाने त्यांच्या जीवनकार्याची माहिती मिळवून प्रा. केशव विष्णु बेलसरे यानीं त्यांचे जें विस्तृत चरित्र कांहीं वर्षांपूर्वी अत्यंत समरसतेनें व भक्तिभावाने लिहिले. त्यांची अधिक उपलब्ध झालेली माहिती जमेस धरून सुधारून वाढविलेली ही तिसरी आवृत्ति काहीं महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झाली आहे. अवघ्या ९।१० वर्षांच्या कालावधींत चरित्र ग्रंथाची तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा सुयोग जुळून यावा, ही मराठी भाविकांच्या दृष्टीनें साधी गोष्ट नाहीं. त्यावरून चारित्राची लोकप्रियता दिसून येते. या ग्रंथाची पृष्ठे सुमारें साडेसहाशे असून त्यापैकी चरित्र जीवनकार्य, त्याच्यासंबंधींचे विविध अनुभव व साधार आख्यायिका सत्यकथा वगैरेनीं सुमारें च्यारशें पानें व्यापिली असून बाकी अडीचशें पानांत महाराजांच्या बोधवचनांचा व तत्त्वज्ञानाचा समावेश करण्यांत आलेला आहे

विशेष म्हणजे प्रा. बेलसरे यांना या सत्पुरुषाचा सहवास सुदैवानें लाभलेला होता. त्यांच्याकडून त्यांना जो नाममंत्राचा लाभ झाला त्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवून तो मंत्र आचरणांत आणल्यामुळे त्यांच्या जीवनाला उजाळा आला व त्यांचें जीवन आनंदमय झालें. अनुभूतीशिवाय सर्व व्यर्थ आहे. त्या अनुभूतीचा लाभ प्रस्तुत लेखकास झाला आणि त्याच प्रकाशांत त्यानीं हें चरित्र अत्यंत समरसतेनें नि आपुलकीनें लिहिलें आहे.

सातारा जिल्ह्यातील गोंदवलें हें गांव महाराजांच्या पूर्वजांचें. त्यांच्या घराण्याकडे त्या गांवचें कुळकर्णीपण होतें. घरचे खाऊन पिऊन सुखी. कशाची ददात नव्हती. आजोबा लिंगोपंत हे त्या भागांतील एक नामवंत व देवभक्त थोर पुरुष. तसेच होते महाराजांचे आईवडील.

अशा घराण्यांत महाराजांचा जन्म १८४४ सालीं झाला. बालपणापासून प्रवृत्ति भजनपूजनकडे व देवधर्माकडे; गुरुशिवाय सद्‌गति नाहीं. असें त्यानीं बालपणीं

ऐकिलें आणि त्यांनीं तोच ध्यास घेतला. ध्यास किती घेतला ? वयाच्या नवव्या वर्षी त्यांनीं दोन बालमित्रांसह पहांटेच्या प्रहरीं कुणालाही न सांगतां सद्गुरुच्या शोधार्थ घरांतून पलायन केलें. त्यांचे दोघे सोबती कंटाळून घरीं परतल परंतु महाराजांची चिकाटी दांडगी त्यामुळें त्यांना मागें फिरण्याची बुद्धि झाली नाहीं. ते कोल्हापूरला असल्याचें समजल्यावरून वडील तिकडे गेले आणि त्यांची कशीबशी समजूत घालून त्यांना स्वगृही घेऊन आले.

घरांत मन रमत नव्हतें. लक्ष होतें सद्गुरु चरणांकडे. त्यांच्यात सुधारणा व्हावी म्हणून अनेकांच्या सल्ल्यावरून त्यांना चतुर्भुज करण्यांत आलें. आईवडिलांच्या समाधानासाठीं त्यांनी कांही काळ घरसंसार संभाळला आणि एके दिवशीं संधी पाहून ते पुनश्च घरांतुन निसटले. व गुरूच्या शोधार्थ अनेक गांव, जंगले, अरण्यें त्यांनी पायाखाली घातलीं. त्यांनी अंगावरील कपड्यांची किंवा जेवणाखाण्याची केव्हांही पर्वा केली नाहीं; एकच ध्यास ! आणि त्याच्यासाठीं वाटेल तेवढे त्रास सोसण्याची तयारी !

त्या काळात त्यांनीं रामकृष्ण परमहंस, अक्कलकोटचे स्वामीमहाराज, श्री. माणिक प्रभू महाराज यांच्यासारख्या थोर संत महात्म्यांची भेट घेतली. त्यांच्या सहवासाचा नि आशीर्वादाचा लाभ घेतला; परंतु प्रत्येकानें त्यांना सांगावें कीं, तुमचे गुरु होण्याचें भाग्य आमचें नाहीं. तें ज्यांचें आहे त्यांचा लाभ तुम्हांला लौकरच होणार आहे ! आणि महाराज त्या आशेवर सतत पायपीट करीत होते.

आणि शेवटी काय झाले ? मोंगलाईतील येहळे गावात त्यांना आपल्या गुरुमाऊलीचा शोध लागला एकदांच्या ! त्यांच्या जीवनातील तो महत् भाग्याचा सुदिन होता. या सत्पुरुषाचें नांव होतें तुकामाई. ही स्वारी मोठी अवालिया होती. त्यांना अन्नवस्त्राचें कशाचेंही भान नसे. त्यांच्या विक्षिप्त वागण्यासंबंधी किती तरी कथा या ग्रंथांत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्या रसाळ तशाच हृदयस्पर्शी आहेत.

या तुकामाईंची आणि महाराजाची भेट जुळून आली. ज्या गावात ते असल्याचें समजले त्या गांवी जाणें फार त्रासाचें नि दगदगीचें परंतु ध्यास घेतलेल्या माणसाला त्याचें काय !

मजल दरमजल करीत मोठ्या उत्कंठेनें महाराज त्यांच्याकडे आतुरतेनें धांव घेत होते. तुकामाई कधीं जंगलांत, कधीं शेतांत, तर कधीं पाण्यांत, चिखलांत कुठें तरी असायचे ! महाराज येऊन भेटण्यापूर्वी तीन दिवस अगोदर तुकामाईंनीं ओरड चालविली होती कीं, "अरे ! लौकरच चोर येणार आहे आणि सगळें लुटून नेणार आहे. संभाळा रे संभाळा !" इतरेजनांस त्यांत काय समजणार ? आणि शेवटीं महाराजांची आणि तुकामाईंची एकदाची भेट झाली. तुकामाई महाराजांशीं आरंभी अत्यंत

१८५

कठोरपणे नि तुसडेपणाने वागले. परोपरीनें त्यांना कसोटीला लाविले. महाराजांनीं या गुरुमाऊलीची सेवा अत्यंत अनन्यभावें नि मनापासून केली. ते कसोटीला पूर्णपणे उतरले.

शेवटीं गुरुमाऊली त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि ज्यासाठीं त्यानी धडपड चालविली होती तो त्यांचा हेतू सफळ झाला.

त्यानंतर महाराजानीं काही काळ तीर्थाटणांत घालवून नंतर मातोश्री गीताबाई यांच्या समाधानासाठीं त्यानी गृहस्थाश्रमांत प्रवेश केला. त्यांचा गृहस्थाश्रम सर्व परीनें आदर्शवत होता. त्यांनी असंख्य लोकांना भक्तिमार्गाकडे व नामसंकीर्तनाकडे वळविले राजे महाराजे त्यांच्या भेटीसाठीं धडपडत असत. क्रांतिकारक वासुदेव बळवंत नि लोकमान्य टिळक यांच्या नि त्यांच्या भेटी गांठी होत असत. त्यांची थोरवी सर्वजण ओळखून होते.

महाराज पुण्यास आले म्हणजे लो. टिळक एक रुपया नि नारळ घेऊन त्यांच्या भेटीस जात असत व त्यांचा आशीर्वाद मिळवीत असत. त्यांचें बोलणें बहुधा एकांतांत होत असे. त्यानीं गायकवाड वाड्यासही एकदां भेट दिली होती.

महाराजांच्या अशा किती कथा सांगाव्या ? वाचकांनीं त्या या चरित्रग्रंथांतून जरूर वाचाव्या.

मनुष्याला याच देहांत देवत्त्व संपादन करतां येतें. यासाठीं दोन गोष्टींची फार जरुरी आहे. काय पाहिजे ? संतांचा सहवास नि भगवंताचें नाम या दोन गोष्टींची निष्ठापूर्वक कांस धरल्यानें मनुष्य देवत्त्वाप्रत जाऊं शकतो. संतांच्या संगतीचा लाभ सर्वांनाच घडूं शकतो असें नाहीं. नामस्मरण हें प्रत्येकाच्या हातांतील आहे आणि तें फार मोलाचें आहे हें जाणून महाराजानीं नामस्मरणाचा प्रसार जीवनभर अगदीं मनापासून केला. तोंडानें बोलूं लागल्यापासून तों मृत्यूनें त्यांचे तोंड बंद होईपर्यंत त्यानी नामस्मरणाचा प्रचार पोटतिडकेनें केला. कसें आहे पहा. नामस्मरणाला कसली अट नाहीं व कसलें बंधनही नाहीं. त्याने जरूर असलेल्या सत्संगाचाचाही लाभ होतोच होतो- त्यांत भगवंताचे चिंतन सहजासहजीं घडतें. त्यांतून अनुसंधान उदय पावतें. आणि अनुसंधान परिपक्व झाले म्हणजे स्वतःच्या हृदयांतच भगवंताचे दर्शन घडतें असें आहे नामस्मरणाचें महात्म्य.

[ श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज चरित्र आणि वाङ्मय. लेखक--प्रा. के. वि. बेलसरे एम. ए., प्रकाशक; बुक सेलर्स पब्लिशिंग कंपनी, मेहेंदळे बिल्डींग, मुंबई ४ किं. १० रु. पृ. ६५०. ]

—पु. बा. कुळकर्णी

# निर्णय-सागरची अक्षर-साधना

हें छोटें चरित्र प्रथितयश चरित्रकार श्री. पु. बा. कुळकर्णी, मुंबई यांनी लिहिलें असून तें नुकतेंच जावजी शेठजींच्या ७६ व्या पुण्यतिथीस श्रीरामनवमीस प्रकाशित करणेंत आलें आहे. प्रथमदर्शनीं मुखपृष्ठावर चरित्रनायक जावजी दादाजी यांचें हसतमुख व मव्योदात्त तीन रंगी उठावदार चित्र दिलें असून कागद, छपाई सुबक आहे. छापील पृष्ठे ११२ असून किंमत त्या मानानें ( रु. १-६० ) फार नाहीं. पुस्तक वाचतां येणाऱ्या मुलांना, तरुणांना, प्रौढांना, नव साक्षरांना-सर्वांनाच मनोरंजक, स्फूर्तिदायक व आळस झाडून कार्याच प्रेरणा व संचालना देणारें व म्हणून संग्राह्य झालें आहे.

जावजी एक साधा मनुष्य. लहानपणींच वडील वारलेले, शिक्षणाची आबाळ झालेली, आई फळविक्रीचा धंदा करून दोघांचे जेमतेम पोट भरणारी, थकलेली, अशा वेळीं वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी आईच्या कष्टाचा कळवळा येऊन, उनाडक्या सोडून नोकरी शोधणारा व २ रु. दरमहावर एका मिशनरी साहेबाच्या छापखान्यात टाइप घासणेस राहिलेला मुलगा पुढें सतत उद्योग, कर्तव्यनिष्ठा, सचोटी व बुद्धिचातुर्यबळावर पुरेसा पैसा मिळवून स्वताची अल्पावधीत सुंदर वळणदार अक्षराची टाईप फौंडरी काढतो, इतकेंच नव्हेतर व्यवसाय वाढवतां वाढवतां स्वतःचा छापखानाहि काढून त्या द्वारें लोकोपयोगी, सन्मित्रांच्या साहाय्यानें संस्कृत वाङ्मय पौराणिक वाङ्मय, संत वाङ्मय, बालवाङ्मय, प्रसंगीं झीज सोसूनहि प्रकाशित करतो, एवढेंच नव्हे तर आपली संस्था व तिचें कार्य आपल्या मागेंहि दीर्घकाळ, नव्हे अखंड चालू रहावें अशी व्यवस्था करून ठेवतो ( व याचा पडताळा आज १०० वर्षे लोटली तरी येतो ) यावरून या माणसाची केवढी कर्तबगारी व थोरवी असावी याची कल्पना सुजाण माणसास होते व तेंच या पुस्तकांत कोणलाही सहज समजेल अशा साध्या, सोप्या, म्हणीवजा चटकदार, सुटसुटीत भाषेंत, चुटचुटीत शब्दांत छोट्या छोट्या वाक्यांत, आकर्षक व मनोरंजक रीतीनें सांगितलें आहे. पुस्तक वाचणेस हातीं घेतल्यावर तें वाचून संपल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं, इतकें बेभान होण्याचें सामर्थ्य या पुस्तकांत आहे. केरळकोकिळकर्ते 'महाराष्ट्र भाषाचित्रमयूर' श्री. आठल्ये यांचे जावजी दादाजी' वरील प्रदीर्घ सुश्लिष्ट काव्यहि या चरित्रास जोडल्यामुळें तें अधिकच चित्ताकर्षक व संस्मरणीय झालें आहे. अशाप्रकारचें बहुमोल पुस्तक लिहून प्रकाशित केल्याबद्दल लेखकाबरोबरच प्रकाशकांनाहि धन्यवाद द्यावेत तितके थोडेच !

( निर्णयसागरची अक्षर-साधना-अर्थात शेठ जावजी दादाजी यांचें चरित्र. लेखक-पु. बा. कुळकर्णी. प्रकाशक-निर्णयसागर प्रेस, डॉ. वेलकर स्ट्रीट, मुंबई २, किंमत १ रु. ६० न. पै. पृष्ठें-११२ )

—वासुदेवसुत कारेकर, कोल्हापूर

# विचार लहरी

140

**मागच्या अंकांत मी श्री मेहेरबाबा यांच्या ७४ व्या वाढदिवसाचा उल्लेख केला. आज आपण त्यांच्याविषयीं अधिक माहिती मिळवू.**

मेरबान शेरिअर इराणी हें मेहेरबाबा यांचे संपूर्ण नांव. त्यांचा जन्म २५ फेब्रुवारी १८९४ या दिवशीं पुणे येथे झाला. त्यांचे वडील, शेरिअर इराणी, हे जन्मानें पारशी होते. ईश्वर साधनेंत ते सदा दंग असत. मेरबान यांचे माध्यमिक शिक्षण ख्रिश्चन शाळेंत झालें आणि उच्च शिक्षणासाठीं ते डेक्कन कॉलेज मध्यें दाखल झाले. सन १९१३ सालीं त्यांच्या जीवनांत एक महत्त्वपूर्ण घटना घडली. अंगी दैवी गुण असलेल्या हजरत बाबा जान या मुसलमान महिलेशीं त्यांचा परिचय झाला. या थोर महिलेच्या सान्निध्यानें मेरबान यांना साक्षात्कार झाला. त्यांना आपल्या दैवी कर्तव्याची जाणीव झाली. नंतर त्यांचा साकोरीचे उपासनी महाराज यांच्याशी परिचय झाला. सात वर्षे ते त्यांच्या सान्निध्यांत होते. उपासनी महाराजांनी मेरबान यांना दैवी ज्ञान प्रदान केलें. १९२१ सालीं मेरबान यांनीं आपला संप्रदाय सुरूं केला. त्यांच्या शिष्यांनी मेरबान यांना मेहेरबाबा म्हणजे दयाशील पिता ही पदवी बहाल केली. जातीभेद व धर्मभेद न मानणारे शिष्य एकत्र आले आणि अहमदनगरजवळ मेहेराबाद या नांवानें एक नव संस्कृती केंद्र जन्माला आलें. या केंद्राद्वारें मोफत शिक्षण देणारी शाळा, विनामूल्य हॉस्पिटल व दवाखाना, गरिबांच्यासाठी वस्तीस्थान सुरूं करण्यांत आलें. मेहेरबाबा यांनीं आपल्या शिष्यांना ईश्वरोपसना व समाज सेवा यांची दीक्षा दिली.

दिनांक १० जुलै १९२५ हा मेहेरबाबा यांच्या जीवनांतील अत्यंत महत्त्वाचा दिवस. या दिवशीं मेहेरबाबा यांनीं मौन पाळण्याचे ठरविलें. आणि आजपर्यंत ते मौनावस्थेंत आहेत. अक्षरांचा फलक व शारीरिक हावभाव या द्वारें ते आपल्या भावना, विचार व अनुभव व्यक्त करीत असतात.

मेहेरबाबा यांनीं सहा वेळा जगाचा प्रवास केला आहे. १९३१ सालीं ते प्रथम युरोपांत गेले. त्यांची शेवटची अमेरिकेची भेट १९५८ सालीं झाली. अमेरिकेंत Myvtle deach, S. C. येथें मेहेरबाबा यांचे एक केंद्र सुरूं आहे.

मेहरबाबा यांच्या दर्शनासाठी व आशीर्वादासाठी कधीं कधीं १००००० पर्यंत अनुयायांचा जमाव जमतो. त्यांच्या सहवासाचा लाभ मिळावा म्हणून, निदान एक दिवस दर्शन घडावें म्हणून जगाच्या कोनाकोपऱ्यांतून भक्तगण येत असतात. आपल्या भक्तांशीं वैयक्तिक संपर्क साधतां यावा यासाठीं मेहेरबाबा सदैव प्रयत्नशील असतात. देशांमधील दौऱ्यांचा हाच उद्देश असतो. व्याधीग्रस्त रुग्णांची सेवा, हजारो गरीबांचें पाद प्रक्षालन आणि अनाथांना धान्य व कापड यांचें वाटप याचा अंतरभाव त्यांच्या कार्यक्रमात होतो.

मेहरबाबा अधिकारवाणीनें सांगतात की मी प्रेषित आहे. अज्ञानाचें निर्मूलन करण्यासाठी व मानवाला परमेश्वराचा साक्षात्कार करून देण्यासाठी मी जन्म घेतला आहे. भक्तगण मेहेरबाबा यांना भगवंताचा अवतारच मानतात.

× × ×

" God Speaks, " " देववाणी, " ह्या पुस्तकांत श्री. मेहेरबाबा यांनीं आपले विचार ग्रंथित केलें आहेत. भारत हे अध्यात्मशास्त्राचें मूलस्थान आहे. पाश्चिमात्य विद्वान मानवाच्या बाहेरील जगाचें संशोधन करण्यांत गर्क असतात; भारतीय तत्त्वचिंतक मानवाच्या अंतरमनाचा ठाव घेण्यासाठीं सदैव प्रयत्न करीत असतात. भारतीयांनीं या क्षेत्रांत खूपच प्रगति केली आहे. हटयोग या नांवाचें शास्त्रच निर्माण झालें आहे. गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ हे ह्या क्षेत्रांतील अधिकारी पुरुष. संत ज्ञानेश्वर हे त्याच परंपरेतील आहेत. ज्ञानेशांनीं दैवी सामर्थ्यानें रेड्याकडून वेद पठण करविलें, निर्जीव भिंत चालविली. याच हटयोगाचें दर्शन " देववाणी " या पुस्तकांत घडतें. पाश्चिमात्यांना हे सर्व नवीन असल्यामुळें ते या विषयाकडे विशेष आकर्षिले जातात. हटयोगानें अष्टसिद्धी प्राप्त होतात; पण अष्टसिद्धींची प्राप्ती म्हणजे परमेश्वर प्राप्ती नव्हे. परमेश्वर सर्व सिद्धींच्या अतीत आहे. चराचर विश्व व्यापून तो दशांगुळें उरला आहे. श्री मेहेरबाबा हेंच सांगतात.

× × ×

" देववाणी " या पुस्तकांत श्री मेहेरबाबा यांनी मुसलमान धर्मातील सुफी सांप्रदायाचा वारंवार उल्लेख केला आहे. सुफी सांप्रदाय हा भारतीय तत्त्वज्ञानाशीं खूपच जुळता आहे. सुफी सांप्रदायाचा परमोत्कर्ष आपणाला संत कबीर यांच्या काव्यांत आढळतो. राम आणि रहिम एकच आहेत, मंदिर व मशीद यांना वेगवेगळे अस्तित्व नाहीं. असेच कबीर प्रति पादन करतात. याच प्रतिपादनानें आकर्षिलें जाऊन विश्ववंद्यकवि रवींद्रनाथ टागोरांनीं कबीरांच्या १०० दोह्यांचा इंग्रजींत अनुवाद करून जगाला तो बहाल केला. इव्हिलिन अंडरहिल या ख्यातनाम विदूषीनें या अनुवादाला विवेचनात्मक प्रस्तावना जोडली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचें आकर्षण केवढें आहे याचें ही प्रस्तावना उत्तम उदाहरण आहे. श्री साईबाबा हेही याच मानव धर्माचे प्रवर्तक होते.

× × ×

मानवी मनांतील सद्भावनेला जबरदस्त धक्का देणारी घटना म्हणजे डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांची प्राणहत्या. श्रीमती कोरेटा किंग यांनी व्यथित मनानें म्हटल्याप्रमाणें आणखी किती जणांचे बळी मानवी मनांतील दुष्ट प्रवृत्ती घेणार आहे ! लिंकन, गांधी, केनेडी, किंग. ! श्रीमंत वि. गरीब, काळे वि. गोरे, सत् प्रवृत्ती वि. दुष्टप्रवृत्ती या द्वद्वांतील झगडा संपणार केव्हां ! मानवी मन निराशामय बनते. पण या निराशेला प्रकाशमय वलय आहे.

डॉ. मार्टिन लुथर किंग यांच्या सहधर्मचारिणी दुःखावेग सहन करीत म्हणाल्या, "जर आपण डॉ. मार्टिन लुथर किंग यांची प्रेरणा आत्मसात करूं शकलों, आणि मला वाटते आपण ती करूं शकूं, तर आपण अमेरिकन राष्ट्रामध्ये एक नवसमाज निर्माण करूं, त्या समाजामध्यें प्रेम, न्याय शांतता, बंधुता यांचें अधिराज्य असेल आणि सर्वंजण बंधु भावनेनें प्रेरित झालेले असतील.

* * *

डॉ. मार्टिन लुथर किंग याच्या अंत्य सस्कारानिमित्त मुंबईत चर्चमध्ये प्रार्थना म्हणण्यांत आली. बिशप रॉबिनसन् यांनीं प्रार्थनेला सुरुवात केली. किंग यांचें आवडतें गीत गाण्यांत आलें. योगायोग हा की त्याच वेळी चर्चजवळील मशीदींतून प्रार्थनेसाठी बांग देण्यात आली. जणूं मानव हा एक आहे आणि देवावरील निष्ठा हाच समान दुवा आहे असा या योगायोगाचा अर्थ आहे ! या प्रसंगीं राज्यपाल व इतर प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.

* * *

शके १८९० मधील राम नवमी हा निर्णय सागरच्या इतिहासात एक अभिनव पर्व सुरू करण्यारा दिवस गणला जाईल. अक्षर साधनेचे आद्य प्रणेते शेठ जावजी दादाजी चौधरी यांचे पुण्यस्मरण त्या दिवशीं करण्यांत आलें. हा दिवस म्हणजे त्यांची ७६ वी पुण्यतिथी होती. अक्षरांची ओळखही फारशीं नसणाऱ्या पुरुषाने अक्षरांची टांकसाळ मुंबईत सुरू केली व ती सौंदर्याच्या दृष्टीनें शिखरास पोहोचविली. मानवी कल्पकतेचा हा परमोच्च बिन्दू होय.

निर्णय सागर म्हणजे निव्वळ एक छापखाना नव्हे तर, निर्णयसागर म्हणजे संस्था आहे हे त्या दिवशींच्या समारंभानें सिद्ध केले. सरस्वतीच्या प्रांगणात ललामभूत असणाऱ्या व्यक्तीं त्या दिवशी शेठ जावजी दादाजी चौधरी यांच्या पुण्य स्मृतीला अभिवादन करण्यासाठी एकत्रित झाल्या होत्या. डॉ. प. ल. वैद्य, डॉ. कृ. र. पोतदार पद्मश्री प्रा. अनंत काणेकर, आमदार प्रा. अनंत नामजोशी, डॉ. मालशे, प्रा. गुंजीकर, ह्या थोर विद्वानानी निर्णयसागरच्या अक्षर साधनेची महती मुक्त कंठांनी गाईली. भारतीय पंचांगाचे आद्य प्रवर्तक म्हणून निर्णय सागरचें नांव सर्व भारतभर मशहूर आहेच. अक्षर साधनेला अधिक सहाय्यभूत व्हावे म्हणून शेठ जावजी दादाजी चौधरी यांच्या नांवाने एक पंचांग संशोधन केंद्र व संस्कृत पुस्तकालय या दिवशी सुरू करण्यात आले. श्री. पु. बा. कुलकर्णी यांनी लिहिलेले शेठ जावजी दादाजींचे विस्तृत चिरत्र वाचकांच्या समोर आहेच. याच पुस्तकाची श्री. कुलकर्णी यांनी काढलेली संक्षिप्त आवृत्ती प्रा. काणेकर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. श्री ज्ञानेश्वर श्री एकनाथी भागवत, श्री एकनाथी भावार्थ रामायण आणि श्री तुकाराम—गाथा या या चार महान प्रासादिक ग्रंथांचे पुनर्मुद्रण प्रा. नामजोशी यांच्या हस्तें सुरू करण्यांत आलें. प्रभु रामचंद्रांच्या मंगल जन्म दिनीं हे उपक्रम करण्यांत आले ही एक औचित्य पूर्ण घटना आहे.

निर्णयसागर ही अखिल भारतीय किर्तीची संस्था होवो !

—द. मो. चित्रे

# खेड्यासंबंधीं माझे चिंतन

लेखक :—द. मो. चित्रे. जि. कुलाबा

( १ ) हाशिवरें येथील माझ्या साडेचार महिन्यांच्या वास्तव्यामुळें मला ग्रामीण जीवनाचें एक नवदर्शन झालें. सर्वस्वी अनोळखी अशा एका खेड्यात माध्यमिक शिक्षक म्हणून मी गेलो; आणि जणूं जन्मोजन्मीचें ऋणानुबंध आहेत अशा भावनेनें दिवाळीच्या सुट्टीत परत आलों. माझें शरीर शहरांत आहे; पण मन माझ्या लाडक्या बालमित्रांच्या सभोवती घोटाळत आहे. माझें स्थान शहरांत नाहीं. खेडेगांवात आहे, असाच याचा अर्थ आहे.

( २ ) भारतीय घटनेनें राष्ट्राला लोकशाही प्रधान राज्यव्यवस्था बहाल केली. त्याला आज २० वर्षे झाली. त्यावेळी निरक्षरतेचें प्रमाण खूपच होतें. आज शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी झाला आहे. लक्षावधी बालकें माध्यामिक शाळेंत शिक्षण घेत आहेत. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे; पण त्याच बरोबर शिक्षणाचा दर्जा खालावत चालला नाहींना, अशी शंका मनाला चाटून जाऊं लागली आहे.

( ३ ) वर्तमान पत्राचें नुसतें पान उघडा, कोठें ना कोठेंतरी विद्यार्थ्यांची दंगल चालू आहे असेंच वाचावयास मिळतें. असें का घडते आहे याचे मन विचार करूं लागते, आणि भारतासमोर कोणता भविष्यकाळ ओढून ठेवला आहे या चिंतेनें मन व्यग्र होतें. पण माझ्यासमोर माझी लाडकी बालकें उभी राहतात; आणि एक विलोभनीय दृश्य दिसू लागतें.

( ४ ) संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज सांगतात, आर्जवून सांगतात; "प्रेम मय हेंच पांडुरंगाचें स्वरूप आहे. सर्वत्र प्रेमच भरलें आहे. फक्त उणीव आहे ती घेणारांची." हाशिवरें येथें मी मुलांना माझें अंतःकरण दिलें. अनंत पटीनें त्यांनीं त्याला प्रतिसाद दिली.

( ५ ) खेडे गांवांत शिक्षकाला मानाचें स्थान आहे. एक सुबुद्ध व अनुकरणीय व्यक्ति म्हणून ती मानली जाते. शिक्षकाला जर आपल्या स्थानाचें महत्व समजलें असेल, जर त्याला आपल्या कामाबद्दल आस्था व कळकळ असेल, लोकशाहीवर जर त्याचा दृढ विश्वास असेल, तर लोकशाहीचें भवितव्य भारतात उज्वल आहे.

( ६ ) सर्वत्र जगभर आज एक नवचैतन्य खेळूं लागलें आहे. ज्ञात इतिहासांत कधींही नव्हती अशी जागृति बहुजन समाजांत झाली आहे. वंशभेद, वर्णभेद मार्गे पडूं लागले आहेत जगभर आर्थिक समानतेसाठी मोठ्या प्रमाणावर संघर्ष चालू आहे. भारतांत त्याचे पडसाद उठणें क्रमप्राप्त आहे.

(७) हाशिवऱ्याकडे मी परत वळतों. ९ वीच्या वर्गात मी नागरिक शास्त्र शिकवितो. आजची बालकें लवकरच मतदानास योग्य अशा वयाची होणार आहेत. त्यांच्या मनावर व बुद्धिवर योग्य असे संस्कार केले तर केवढें प्रचंड कार्य करतां येईल !

(८) संस्काराचा पाया म्हणजे शिक्षण. आणि शिक्षण म्हटले म्हणजे भाषेचें माध्यम आलेंच. मातृभाषा म्हणजे व्यक्तीचा प्राण. आणि हिंदी म्हणजे राष्ट्राचा जीवनाधार. पण इंग्रजीची उपेक्षा म्हणजे व्यक्तीच्या उन्नतीवर कठोर आघात आहे असें माझें स्पष्ट मत आहे. उच्च शिक्षणाचें माध्यम आहे इंग्रजी. विज्ञान विषयक व तंत्र विषयक पुस्तकें आहेत इंग्रजींत. जागतिक भाषांत इंग्रजीला महत्वाचें स्थान आहे. तेव्हां इंग्रजीची उपेक्षा केवढी हानीकारक ठरेल !

(९) इंग्रजी कोणत्या पद्धतीनें शिकवावें ? मॉंटेसॉरी वर्गापासून ज्यांचा इंग्रजीशी संपर्क असेल अशा मुलांना Direct method योग्य होईल. पण ग्रामीण विद्यार्थ्यांना Translation method योग्य होईल. विद्यार्थ्यांना धड्यांचा अर्थ नीट मराठींतून समजावून द्यावा. व्याकरणाचे बारकावें शिकवावें आणि मग इंग्रजीमध्यें खूप Drilling work करवून घ्यावें. इंग्रजी जितके जास्त कानीं पडेल तेवढें जास्त इंग्रजी लिहितां वाचतां बोलतां येईल. इंग्रजीचें मामुली ज्ञान मला सर्वथैव नापसंत आहे. मराठी माणसें वरच्या क्षेत्रांत व सैन्यांत चमकणार असतील तर ती इंग्रजी माध्यमाच्या द्वारेंच. कारकून हमाल व प्यून्स एवढेंच ध्येय नसावें.

(१०) शेतकी हा भारताचा प्रधान व्यवसाय आहे. पण हा व्यवसाय जुन्या पद्धतीनें नव्हे तर शास्त्रीय दृष्टीकोनातून केला पाहिजे. तरुण मनाला मातीचा स्पर्श अवांछनीय वाटतो हें चांगलें लक्षण नाहीं. गुडघाभर चिखलांत रोपें लावण्यांत दंग होणारी माणसें वृद्धच दिसून येतात. १० वर्षांनंतर काय घडेल याची दखल आज घ्यावयास हवी. परकीय गहूं व तांदूळ शृंखला आणतिल. म्हणून तरुण मनाला शेतीचें आकर्षण वाटेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. शेती हा किफायतशीर व्यवसाय झालाच पाहिजे.

(११) हाशिवरें हा एक समृद्ध गांव आहे. गांवांत तोंडल्यांचें उत्पन्न चांगलें येतें. एक दिवसा आड, कधींकधीं दररोज, एक ट्रकभर तोंडली मुबईस रवाना होतात. आंब्यांच्या मोसममध्यें चांगले हापूस आंबे तयार होतात. पपनीस, चिकू व पेरू ही फळें पण तयार होतात. त्यांच्या उत्पादनाचें प्रमाण थोडे कमी आहे.

(१२) बालक हा केंद्र बिंदू मानून येथें खूप काम करता येईल. येथील मागील शिक्षकांचा अनुभव फार विदारक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकावर हल्ला केल्याचें वृत्त आहे. पण माझा अनुभव फार निराळा आहे. शाळेंतील मुलां-मुलींनीच नव्हें तर गांवांतील वयस्कर बंधू-भगिनींनीं व पालकांनीं माझ्यावर आपलेपणाचा वर्षाव केला. या सर्वांनीं मला हाशिवऱ्याचा ग्रामस्थच बनवून टाकलें. पांडुरंगाच्या कृपेनें हे संबंध दृढ होवोत !

हाशिवरें येथें एक Maternity hospital आहे. ह्या हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर आपला व्यवसाय पण करूं शकतात. एक चांगले डॉक्टर म्हणून त्यांची या

पंचक्रोशींत ख्याती आहे. ग्रामीण भागांतील रुग्णांची अधिक सेवा करण्याची संधी सरकारनें त्याना द्यावी. सरकारनें कलेक्टर, मामलेदार, B. D. O. प्रांत साहेब व इतर सरकारी अधिकारी यांना शिक्षकांच्या बरोबर संपर्क साधण्याचा जरूर आदेश द्यावा. हा आदेश ते पाळतात कीं नाहीं याची अवश्य दखल घ्यावी. शिक्षक जेव्हां या अंमलदारांना भेटेल तेव्हां त्याला आदरानें वागवून, त्यानें सांगितलेल्या अनुभवावर व सल्ल्यावर विचारविनिमय व्हावा व त्यांची अंमलबजावणी व्हावी.

( १३ ) शिक्षकाबद्दल एवढें लिहिल्यानंतर त्यांच्या पात्रतेचा विषय आलाच. पदवी परीक्षेएवढें ज्ञान अत्यावश्य आहे. पदवी असली तर उत्तमच. पण त्यानें खूप वाचन, मनन केलेलें असावें. गडकरी, वरेरकर, आपटे, रे. टिळक, टागोर पदवीधर नव्हते. पण तीव्र बुद्धीमत्ता व जीवनाचें सखोल ज्ञान त्यांच्या जवळ होते. या विचारवंतांच्याइतकें, निदान आसपास, तरी ज्ञान असलेंच पाहिजे. चारित्र्य संपन्नता, तर अत्यावश्यक आहे. कारण नवसमाज निर्माण करण्याचें कार्य त्यांस करावयाचे आहे. शिक्षकाला भरपूर वेतन मिळालें पाहिजे. चिंताग्रस्त मन आपलें सर्वस्व कामांत ओतूं शकत नाहीं.

( १४ ) जीवनांत जे योग घडतात ते अर्थपूर्ण असतात असा माझा अनुभव आहे. अगदी योगायोगानें माझा "श्रीसाईलीला" मासिकाशीं संबंध आला आहे. भारतांत सर्वत्र खेड्यांची परिस्थिती जवळ जवळ सारखीच आहे. शिवाय भारतांत खेड्यांचें महत्त्व अनन्य साधारण आहे. कारण विशाल भारत हा खेड्यांचाच देश आहे. शिर्डीला जाण्याचा योग अजूनपर्यंत आला नाहीं. पण पुढें तो येईलच; व काम करण्याची संधीही मिळेल.

( १५ ) श्री साई बाबा यांच्या वास्तव्यानें पुनित झालेलें गांव म्हणजे शिर्डी. तें एक यात्रेचें स्थान झालें आहे. भारतांतील असंख्य ठिकाणाहून असंख्य लोक नित्यशः शिर्डीला भेट देत असतात. या जन संपर्कांचा लोक शिक्षणासाठी केवढा उपयोग होईल !

( १६ ) मानवाचें मन बदलण्याचें साधन म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे निव्वळ पुस्तकी ज्ञान नव्हे. मनावर चांगले संस्कार घडविलें पाहिजेत. आणि संस्कार घडविण्याचा उत्तम काळ म्हणजे बाळपण. शिर्डी येथील विद्यार्थ्यांवर श्री साईबाबांच्या शिकवणीचा परिणाम दिसून आला पाहिजे. बालकांचें संगोपन, बालकांचें संवर्धन, बालकांचें संजीवन श्री साईबाबा शिक्षण केंद्रानें हातीं घ्यावयास पाहिजे. त्याच्या जोडीला कथा कीर्तनें, प्रवचन, व्याख्यान माला हा प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम आहेच श्री साईबाबांच्या कृपेनें शिर्डीचा परिसर ज्ञायमय बनो ! नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते !

( 17 ) May Shirdi Culture be The watch word for the good !

# योगी अरविंद यांचें अमर साहित्य

श्री अरविंदांच्या जीवनकार्याचें समग्र दर्शन घेणें आपल्या शक्तीच्या बाहेर आहे. "श्रीरामकृष्ण परमहंसांचें अवतारकार्य व त्यांनीं दिलेली शिकवण पांचशें वर्षे पुरेल इतकी आहे" असें स्वदेशी चळवळीच्या दिवसांतील एका भाषणांत श्री अरविंदांनीं स्वतःच सांगितलें होतें. श्री अरविंदांचें जीवनकार्य व शिकवण याविषयीं आपणही तसेंच म्हणूं शकतों. "मानवाच्या एकंदर प्रगतीस त्यांच्या कार्याचें किती साह्य झालें हे जगाच्या ध्यानीं येण्यास किती काळ लागेल तो लागो. परंतु त्यांच्या कार्याचें महत्त्व व त्यांनीं दिलेली शिकवण यांचें पूर्ण सामग्र्यानें आकलन होण्यास मानवजातीस निदान पांच हजार वर्षे तरी लागतील, असें एका जगद्विख्यात पाश्चात्य तत्त्ववेत्त्यानें एका भाषण-प्रसंगीं काढलेले उद्गार अतिशयोक्तीचे असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. आध्यात्मिक साधनामार्गावर प्रवास करीत श्रीअरविंद इतके दूरवर व इतके उच्च पातळीपर्यंत पोंचून परत आले व त्यायोगें मागाहून येणाऱ्या साधक वर्गाकरितां मार्गांतील नानविध बिकट अडचणी दूर करून तो सुरक्षित करून ठेवला कीं तसें कार्य यापूर्वी कोणी केलेलें दिसत नाहीं. त्यांनीं साधनामार्गांत दाखविलेली दिशा अगदीं वेगळी व मार्ग अगदीं नवीन असे आहेत.

श्रीअरविंदांच्या अनेकांगीं जीवनसागराची खोली मोजण्याचा प्रयत्न करणें म्हणजे श्रीरामकृष्ण सांगत त्याप्रमाणें मिठाच्या बाहुलीनें हातांत काठी घेऊन सागराची खोली मोजण्यास जाण्याप्रमाणें ते होईल. श्रीअरविंदांच्या भव्य जीवन ग्रंथाचें व दिव्य ग्रांथिक जीवनाचें ओझरतें दर्शन घेतल्यावर जशी अस्पष्ट पुसट प्रतिमा मनःपटलावर उमटल्या त्याचेंच सर्वांग-दर्शन येथें वाचकांस घडवावयाचें आहे.

या विसाव्या शतकाच्या प्रथमच्या दहा वर्षांत श्रीअरविंद उघडपणें राजकीय क्षेत्रांत वावरत होते. त्यावेळच्या राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीवर त्यांचा किती मोठा प्रभाव पडलेला होता याविषयीं अधिक लिहिण्याची गरजच नाहीं. इतकी ती गोष्ट जगजाहीर आहे. त्यावेळी 'सबूरीनें' घ्या म्हणणाऱ्या पक्षाचा जोर होता. त्यास टक्कर देऊन देशामध्यें विशेषतः नवतरुणांच्या पिढीमध्यें जाज्ज्वल्यतेचें व कणखर राजकारणाचें बीज रोवून त्यांनीं आपल्या भाषण लेखनद्वारां राजकारणाच्या

त्यास अगदीं वेगळी दिशा दिली. देश म्हणजे नद्या, पर्वत, खोरीं, अरण्यें व गांवें शहरें यांनीं युक्त असा प्रदेश नव्हे, तर ती आपली खरी आई आहे; जगद्धात्री जगज्जननी देवता आहे; ती शृंखलाबद्ध असून त्या शृंखला आपल्या लेंकरांकडून तोडल्या जाव्यात या अपेक्षेनें त्यांना आवाहन करीत आहे; हें भारतमातेचें अभिनव दर्शन श्रीअरविंदांनीं भारतास करून दिलें आणि त्याच वेळेपासून भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या लढ्याची मुहूर्तमेढ रोवली गेली असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळच्या त्यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'वंदेमातरम्' पत्रांतील जहाल लेखांनीं देशभर देशाभिमानाची लाट उसळून गेली. असंख्य तरुणांनीं आपापलीं जीवनें मातृभूमीच्या दास्यविमोचनार्थ कुर्बान केलीं. कित्येकांची हाडें तुरुंगांतील छळानें पिचलीं, कित्येकांना हद्दपारी झाली. कित्येकांनीं फांसास अलिंगन दिलें, तर असंख्यांचे संसार धुळीस मिळाले. परंतु देशाभिमानाची, भारतमातेच्या प्रेमाची ज्योत, जनतेच्या व तरुण वर्गाच्या हृदयांत जी लावली गेली ती कधींच विझली नाहीं. त्या वेळच्या वंदेमातरम् पत्रांतील लेखांचे ताबडतोब अनेक भाषांतून अनुवाद होऊन त्यांचा प्रांतोप्रांतीं फैलाव होत असे. हे लेख इतके तेजस्वी, जहाल व मूलगामी विचारांनीं परिप्लुत असत कीं, त्यांच्या वाचनानें पुढील काळांत झालेल्या अनेक चळवळींतील तरुणांना स्फूर्ति मिळाली व मार्गदर्शन झालें. आज भारत स्वतंत्र असला तरीहि तें स्वातंत्र्य टिकविण्याच्या प्रयत्नांच्या बाबतींतहि त्या लेखांचें मार्गदर्शन होऊ शकेल, असें त्या लेखांचें स्वरुप कालातीत आहे.

१५ ऑगस्ट १९४७ या भारतास स्वातंत्र्य लाभलेल्या प्रथम दिवशीं श्री अरविंदांनीं जे विचार प्रकट केले ते इतके महत्त्वाचे आहेत कीं, या प्राचीन भारताला ईश्वराने दिलेला स्वातंत्र्याचा ताम्रपटच असें त्याचें वर्णन करतां येईल. तो सर्व संदेश आज व पुढेंहि सतत चिंतनीय व भारताच्या प्रत्येक सुपुत्रानें हृदयावर कोरून ठेवण्यासारखा आहे.

" १५ ऑगष्ट हा स्वतंत्र भारताचा जन्मदिन आहे. नवभारताच्या दृष्टीनें तर हा दिवस, गत युगाचा अंत आणि नवयुगाचा प्रारंभ सूचित करतोच; पण त्याबरोबरच आशिया आणि उरलेले इतर जग यांनाही या दिवसाचें विशेष महत्त्व मानावें लागेल असा हा दिवस आहे. कारण अकल्पनीय स्वरूपाच्या एका नवशक्तीचा संचार जगांतील सर्व राष्ट्रांच्या अंगी झाला हें दर्शविणारा हाच दिवस आहे. भविष्यकाळीं अखिल मानव-जातीचें राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक भवितव्य घडविण्याचें यत्न शक्तिच्या साह्यानें होऊं शकणार आहे. भारत जागृत होत आहे तो केवळ स्वतःच्या

भौतिक जीवनाच्या स्वास्थ्याकरितां, म्हणजे साम्राज्य निर्मिण्याकरितां, बडें राष्ट्र बनण्याकरितां किंवा शक्तिशाली बनून भौतिक सुबत्ता, संपत्ति वाढविण्याकरितां नाही. अर्थात् या बाबीकडे तो दुर्लक्ष करणार नाहीच. तरीपण इतर राष्ट्रांप्रमाणें दुसऱ्या लोकांवर प्रभुत्व गाजविण्याचा उद्देश त्यामागें खाचित असणार नाहीं. तर भारताचें जीवन दिव्यत्वाच्या देवत्वाच्या प्राप्तीसाठीं असून भारत हा सर्वांना मदतीचा हात देणारा आणि अखिल मानवजातीचा मार्गदर्शक म्हणून जगणार आहे. या सर्व गोष्टींबद्दल माझी पूर्वीपासून पक्की खात्री असून, त्याप्रमाणें मी वेळोवेळीं स्पष्टपणें बोललोहि आहें. ऐक्यभावनेचा संचार आज ना उद्यां मानवजातीच्या मनांत होऊन सर्व व्यवहार याच भावनेच्या आधारावर होऊं लागणार यांत संशय नाहीं. या कामीं भारताकडून अध्यात्म विचारांचें बहुमोल दान जगाला मिळूहि लागलें आहे. या विचारांचा प्रभाव युरोप व अमेरिका खंडामध्यें अधिकाधिक जाणवूं लागला आहे. हाच प्रभाव उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. आजच्या भौतिक बळावर चाललेल्या राष्ट्राराष्ट्रांतील धुमश्चक्रींतून होरपळून निघाल्यामुळें सर्वांचेंच डोळे हळुहळु मदतीकरितां, प्रकाशाकरितां भारताकडे वळू लागले आहेत. ”

भारतास स्वातंत्र्य मिळालें परंतु तें ‘ खंडित ’ भारतास. ही गोष्ट श्रीअरविंदांच्या मनास असह्य होत होती. म्हणूनच त्यांनीं स्पष्टपणें जाहीर केले कीं, भविष्यकाळांत भारताकडून जी मानवजातीचें भवितव्य घडविण्याची कामगिरी होणार आहे ती भारत अखंड झाल्यावांचून पूर्णतेस जाणें अशक्य आहे. कारण त्यांचें सांगणे होतें कीं, “ जर भारत खंडितच राहिल तर त्यायोगें त्यास दौर्बल्य येईल, कदाचित् तो पंगु बनेल. अंतर्गत बंडाळीचा सतत धोका राहील, एवढेंच नव्हे तर कोण कोणा नवीन राष्ट्राकडून आक्रमण होऊन पुनरपि भारत परकीय शक्तिच्या दास्यात पडण्याचा धोका आहे. याकरिताच कांहीं होवो, वाटेल त्या उपायानें, वाटेल ती किंमत देऊन भारताचें अखंडत्व टिकविलें पाहिजे, भारताची फाळणी मोडून काढली पाहीजे.” असा कळकळीचा व निकडीचा संदेश त्यांनी नवोदित स्वतंत्र भारतास दिला.

मानवजातीचा युगानुयुगें कसकसा विकास होत गेला आहे, कोणकोणत्या अवस्थातून तिला अनिवार्यपणे जावे लागले आहे व अंतिम उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीने यापुढे कोणत्या अवस्थातून तिला जावें लागणार आहे याचा सूक्ष्म विचार निरनिराळ्या विचारवंतांनीं, समाजशास्त्रज्ञांनीं व निरनिराळ्या आंतराष्ट्रीय राजकीय पुढाऱ्यांनीं सुचविलेल्या सर्व विचार-प्रणालींचे, समाजसत्तावाद वगैरे वादांचें पद्धतशीर परीक्षण करून शेवटीं मानवानें जगांत आध्यात्मिक युग निर्मिण्यासाठीं

झटणें अपरिहार्य आहे हें सिद्ध केलेलें आपणास ' मानव विकासाचें चक्र ' Human Cycle या त्यांच्या अमोलिक ग्रंथामध्यें पहावयास मिळेल. त्याचप्रमाणें त्यांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे—' मानव ऐक्याचें ध्येय ' Ideal of Human Unity मानव व मानवसमूहामध्ये राज्यशासन-विषय-विचार जागृतीचा प्रारंभ कसा होतो. त्याला कोणकोणतीं स्वरूपें प्राप्त होतात, निरनिराळ्या राष्ट्रांचे स्वतंत्रपणें वर्धन व पोषण एकीकडे होत असतांच मध्येंच अचानक कांहीं घटना घडतात कीं ज्यायोगें त्यांचे संबंध अधिक निकट होतात, अधिक जवळ येणें त्यांना भाग पडतें, एकमेकांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव कांहीं काळ तरी ओलांडावी लागते. वास्तविक आपण सर्व ' एकच ' आहोत ही भूमिका तरी स्वीकारावी लागते—या गोष्टी त्यांनीं या ग्रंथामध्यें, निरनिराळ्या राष्ट्रांच्या वाढीच्या इतिहासाचें प्रकरण करून स्पष्टपणें दाखवून दिल्या आहेत आणि या सर्व प्रयत्नांचा शेवट ' जगाचें ऐक्य ' घडवूनच होणार असल्याचें सूचित केलें आहे. "प्रकृतीच्या सर्व घडामोडींची आंतली ओढ तिकडेच आहे. परिस्थितीचें दडपणहि अशा प्रकारें वाढत आहे कीं, वर्तमान आणि भविष्यकालीन प्रश्नांना तोंड देण्यासाठीं तरी सर्व जगाचें ऐक्य अटळ आहे; आणि या सर्वांचा शेवट ' जगत्-राज्य ' निर्मितीमध्यें होणें सहज प्राप्त गोष्ट होणार असून स्वतंत्र अशा अनेक राष्ट्रांचें, सहकार्याच्या तत्त्वावर उभारलेलें ' संघराज्य ' असें त्याचें स्वरूप राहणें आजच्या स्थितीस अतिशय आवश्यक आहे. सर्वांचें स्थान ' समान ' राहील व सर्वांनीं मिळून ठरविलेल्या शर्ती सर्वांकडून कसोशीनें पाळल्या जातील." अशा रीतीनें श्रीअरविंदांनीं जगाच्या राजकीय भवितव्याविषयीं स्पष्ट कल्पना या ग्रंथांत मांडल्या असून अखेरीस उपसंहारात ते म्हणतात, "अखिल मानवजतीचें ऐक्य ही गोष्ट आतां नुसती ध्येयभूत राहणार नसून ती प्रत्यक्ष मूर्तिमान् झाल्याशिवाय राहणार नाहीं आणि त्या ऐक्याचें संरक्षण सर्व राष्ट्रें परस्पर सहकार्यानें करतील. त्याचें भविष्यकालीन स्वरूप प्रत्यक्ष देवाच्या हातीं राहील व त्याच्या संकल्पपुर्तीस मानवजातीचा कांहीं उपयोग होणार असेल तर त्याच्याच संकल्पप्रभावानें ऐक्यतेच्या पायावर. जाणीवेमध्यें जगणारी ही मानवजात चिरंजीवी बनून राहील."

राजकारणाशीं असलेला प्रत्यक्ष संबंध तोडून श्री अरविंद पांडीचेरीस आल्यापासून त्यांच्या अखिल जीवनास आंतरिक, गुढ व आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झालें असलें तरी त्यांची तपस्या अथवा साधना स्वतःकरतां नव्हतीच. भगवत्संकल्पानुसार त्यांना दिलेल्या भाविष्यकालीन कामगिरीस पात्र होण्यासाठीं त्यांच्याकडून साधना करवून घेतली. जात होती. साधना मार्गावर जसजशीं पाऊलें पुढें पुढें पडत जात तसतशी

पुढल्या मार्गाची कल्पना त्यांना दिली जात होती. प्रत्यक्ष भगवंतच त्यांच्याकडून साधना करवून घेत होते.

चार वर्षांच्या पूर्ण एकांत तपश्चर्येनंतर, श्री माताजींच्या सहकार्यानें त्यांनीं 'आर्य' नांवाचें मासिक प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. अर्थात् श्री माताजी त्यावेळीं या नांवानें ओळखल्या जात नसत. आर्य मासिक साडेसहा वर्षें चाललें. तेवढ्या अवधींतच श्रीअरविंदांचे प्रमुख प्रमुख ग्रंथ या मासिकांतूनच क्रमशः प्रसिद्ध झाले. त्या ग्रंथांतील एकंदर विचारधारा व उद्देश या विषयींची कल्पना श्रीअरविंदांच्याच प्रत्यक्ष शब्दांत आपणांस अधिक स्पष्टपणें कळून येईल. ते लिहितात—

"नवयुगाचें नजीकच्या भविष्यकाळांत आगमन होत आहे. त्यावेळच्या प्रभावी विचारधारेस साह्यभुत अशी समन्वयात्मक विचारसरणी वा तत्त्वज्ञान मांडण्याचें कार्य करावें हा उद्देश 'आर्य' मासिकानें ठेवलेला होता. मानवजातीच्या जीवनामध्यें आमूलाग्र बदल होण्याचीं चिन्हें दिसत आहेत, या कल्पनेपासून आम्ही आरंभ केला. या बदलामुळें मानवजात एका नवजीवनाचा लाभ करून घेईल. कोणताहि देश घ्या, जेथें जेथें मानव विचार करीत आहे तेथें तेथें या विषयीची कल्पना व आशा स्पष्टपणें दिसून येत आहे. अशा स्थितींत कांहीं आध्यात्मिक, धार्मिक व सामान्य स्वरूपाचे सत्य सिद्धांत शोधून काढून त्यांच्या प्रतिपादनद्वारा मानवाच्या जाणता–अजाणता चाललेल्या प्रयत्नांस प्रकाश मिळावा व मार्गदर्शन व्हावें ह्या उद्देशानें आम्हीं लेखन करीत आहों. अशा तऱ्हेच्या लेखनास आवश्यक तो आध्यात्मिक अनुभव व इतर सामान्य सत्य सिद्धांतांचें दर्शन आम्हाला झालें आहे म्हणूनच अशा या प्रयत्नास आम्हीं हात घातला आहे. अन्यथा ही गोष्ट आमच्या अधिकाराच्या बाहेर आहे असें झालें असतें. हें जें सत्य ज्ञान झालें आहे त्याची तर्कशुद्ध व आध्यात्मिक दृष्टीनें तत्त्वज्ञानरूपक मांडणी करणें ही गोष्ट अगत्याची असल्यामुळें 'दिव्यजीवन' (Life Divine) या नांवाच्या लेखमालेस प्रथम स्थान दिलें. कारण कोणत्याहि तत्त्वज्ञानास आध्यात्मिक सत्यानुभवाचा आधार अवश्य लागत असतो. अर्थात् ही सर्व विचारप्रणाली प्राचीन वेदांत, उपनिषदें व गीता या विचारांशीं विसंगत नाहीं, हेंहि सिद्ध करणें आवश्यक असल्यानें या नवदृष्टिकोणांतून वेद, उपनिषदें व गीता यांतील कांहीं भागांचें स्पष्टीकरण करून त्यांचाहि आधार म्हणून या लेखमालेंत जागोजागीं उपयोग केलेला आहे. परंतु वेदाविषयीं अधिक सूक्ष्म व मूलगामी विचार करणारे लेख क्रमशः देणें भाग पडलें, कारण तार्किक व मीमांसक यांच्या विशिष्ट दृष्टिकोनातूनच वेदांचे लावलेले अर्थ उपलब्ध असल्यामुळें त्यांतील अनुभवसिद्ध रहस्य काय आहे याची कल्पना देणें अत्यंत जरूरीचें होते. वेदकालीन ऋषींची

विषय मांडण्याची विशेष गूढ अशी कोणती रीत होती, त्यांनीं कोणकोणत्या गूढ प्रतीकांचा उपयोग त्याकरितां केला होता. व त्या द्वारां कोणती सत्य तत्वें त्यांना सांगावयाचीं होतीं याचा उहापोह या लेखमालेंत विस्तारानें केलेला आहे. उपनिषदांपैकीं ईश व केन या दोन उपनिषदांचीं निवड आम्हीं केली. मानवी जीवनांतील एक महत्त्वाचें सत्य म्हणजे कर्मरहस्य. त्याचें आकलन व आचरण करण्याच्या दृष्टीनें अतिशय प्रभावशाली विवेचन गीतेनें केलेलें असल्यामुळें 'गीतेवरील निबंध' ची ( Essays on the Gita ) योजना केली व त्यांत गीतेचें प्रतिपादन सविस्तर सांगोपांग रीतीनें केलें. गीतोक्त दृष्टीनें कर्मसाधना केली असतां त्या कर्मानें मानवास आध्यात्मिक नवजन्म प्राप्त होतो आणि आध्यात्मिक भूमिकेवर चढल्यावर कर्म हें बंधनकारक रहात नाहीं. कर्म आणि अध्यात्म जीवन यांत सुसंवाद साधतो. तत्त्वज्ञानात्मक विचाराच्या आधारें एकादें सत्य सिद्ध झालें तरी तें जर जीवनांत उतरलें नाहीं तर त्याची किंमत नुसत्या तत्त्वविचारापुरतीच मानावी लागते. म्हणून या सत्याचा जीवनांत कसा प्रवेश करावयाचा हें दाखविण्यासाठीं 'योगसमन्वय' ( Synthesis of Yoga ) नांवाच्या ७५ प्रकरणांच्या विस्तृत लेखमालेंत अशा तऱ्हेच्या पूर्वापार चालत आलेल्या निरनिराळ्या योगतपस्येच्या मार्गांचें अनुशीलन करून त्या सर्वांच्या साह्यानें या पृथ्वीवरच दिव्य जीवन व्यतीत करण्यास मानव कसा तयार होऊं शकेल हें सुस्पष्टपणें दाखविलें आहे. अर्थात् हा झाला व्यक्तिविषयक विचार. व्यक्ति दिव्य जीवनास पात्र बनूं शकली तरी याच तत्त्वांना सामाजिक जीवनांतहि व्यवहार्य बनवितां येतें हें दाखविण्याची आवश्यकता असल्यानें 'मानवविकासाचें चक्र' ( Human Cycle ) या लेखमालेंत तसा प्रयत्न केलेला आहे. तसेंच, आज मानवसमाजांत विचारांच्या ज्या ज्या वेगवेगळ्या प्रभावी लाटा दिसत आहेत त्यांचें सूक्ष्म निरीक्षण केलें तर त्या सर्वांची गति अखिल मानवजातीमध्यें ऐक्याची प्रस्थापना करण्याकडे असल्याचें स्पष्ट दिसतें. याचें साधार प्रतिपादन 'मानव-ऐक्यतेचें ध्येय' ( Ideal of Human Unity ) या दीर्घ लेखमालेंत केलें आहे."



## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | [illegible]-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}" \times 13\frac{1}{2}"$ medium | **00-37** |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}" \times 13\frac{1}{2}"$ medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices..

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,

ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि

आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण

सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर



मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

संपादक व प्रकाशक : ना. अ. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४१/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.